



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १०४ * नांदेड * सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राज्यात एकीकडे तापमान ४४ अंशावर, तर दुसरीकडे अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

## शेतकऱ्यांची चिंता वाढली

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सध्या राज्याच्या अनेक भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. तर विदर्भात तापमाने ४४ अंशाचा उच्चांक गाठला आहे. तर काही भागात पाऊस देखील झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सांगली जिल्ह्याच्या अनेक भागामध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आहे. तासगाव तालुक्यातील गोटेवाडी या ठिकाणी गारासह अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. तासगाव, कवठेमहांकाळ भागासह सांगली शहरांमध्ये जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे.

सांगली जिल्ह्याच्या अनेक भागामध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आहे. तासगाव तालुक्यातील गोटेवाडी या ठिकाणी गारासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तासगाव, कवठेमहांकाळ कुपवाड भागासह सांगली शहरांमध्ये पाऊसास सुरुवात झाली आहे. गारांच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच तासगाव तालुक्यात द्राक्ष शेतीला मोठा फटका बसला आहे.

विदर्भात तापमानाचा पारा वाढला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील उष्णतेचा पारा ४४ अंशांवर पोहोचला आहे. या कडाक्याच्या उन्हाचा फटका आता वीज यंत्रणेलाही बसत आहे. वाढत्या लोडमुळे आणि उष्णतेमुळे ट्रान्सफॉर्मरचे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी ही अनोखी शक्कल लढवण्यात आली आहे.

### नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यात जोरदार पाऊस

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यात रविवारी अचानक सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. कडक उन्हाने त्रासलेल्या भोकरवासियांना या पावसामुळे गरमीपासून अल्पकाळ दिलासा मिळाला. उमरी, हिमायतनगर, देगलूर या तालुक्यांत आता ढगाळ वातावरण निर्माण झाले होते.

त्यामुळे भर उन्हात माणसांसोबत आता यंत्रांनाही कुलरची गरज भासू लागली आहे.

वाशिम जिल्ह्यात सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर वाढली असून, उन्हाचा पारा४४ पर्यंत गेल्याने उष्णतेच्या लाटेचा फटका लहान मुलांच्या आरोग्यावर बसू नये यासाठी जिल्हा प्रशासनाने शाळेच्या वेळेत बदल केला आहे.

# इराण युद्धाच्या भडक्यात उत्तर कोरियाची उडी; बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा धडाका

**सेऑल (वृत्तसंस्था)–** उत्तर कोरियाने रविवारी समुद्रात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी केली. इराणमधील युद्धाचा तणाव आणि अमेरिका व दक्षिण कोरियासोबत संभाव्य चर्चेच्या पार्श्वभूमीवर उत्तर कोरियाने आपल्या क्षेपणास्त्र चाचण्यांचा वेग वाढवला आहे.

प्योंगयांगची ही तीव्र क्षेपणास्त्र क्रिया या महिन्यातील चौथी आणि वर्षातील सातवी चाचणी आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव निर्माण करण्यासाठी आणि आपली स्व-संरक्षण क्षमता दाखवण्यासाठी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. दक्षिण कोरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष सुरक्षा सल्लागार किम की जुंग म्हणाले की, या क्षेपणास्त्र प्रक्षेपणांमधून उत्तर कोरिया कदाचित हे दाखवू इच्छित आहे की इराणच्या उलट आमच्याकडे स्वतः ची संरक्षण क्षमता आहे. तसेच अमेरिका आणि दक्षिण कोरियाशी संवाद साधण्यापूर्वी शक्तीप्रदर्शन करून दबाव निर्माण करण्याचा हा त्यांचा प्रयत्न असू शकतो.

# धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पोलिसांना कडक निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** लैंगिक शोषण, खरात प्रकरण आणि मुंबईतील गोरेगाव ड्रग्ज प्रकरणांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी गृह विभागाच्या बैठकीत सविस्तर आढावा घेतला. या सर्वप्रकरणी तपास अधिक प्रभावी व निष्पक्ष करण्याचे निर्देश त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांना दिले. तसेच धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी बैठकीत दिल्याचे सूत्रांनी सांगितले. या बैठकीला राज्याचे पोलिस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, एसआयटी प्रमुख तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.



धर्मांतराच्या प्रकरणावर बोलताना, धर्मांतरासारखे प्रकार अजिबात खपवून घेऊ नका, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. हे प्रकरण स्वतःहून उजेडात आणल्याबद्दल नाशिक पोलिसांचे त्यांनी कौतुक केले. मात्र, आता तपास तितकाच दमदार व्हावा, यात असणाऱ्या सर्व पॅटर्नचा तपास करा, कोणताही मुद्दा तपासातून सुटू नये, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले. परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात पीडितांना तक्रार देण्यासाठी विश्वास देणे आवश्यक असल्याचे सांगत, त्यासाठी समुपदेशनाची मदत घेण्याच्या सूचना केल्या. संबंधित समाजसेवकांचा सहभाग वाढवून पीडितांना आधार देण्यावर त्यांनी भर दिला.

खरात प्रकरणात पीडितांचा विश्वास जिंकणे सर्वात महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात दोषी कोणीही असो, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, यासाठी भक्कम पुरावे गोळा करण्याचे आदेश त्यांनी दिले. न्यायालयात खटला मजबूत होण्यासाठी तपासाची दिशा ठोस ठेवावी आणि अपराधसिद्धी हा केंद्रबिंदू असावा, असे त्यांनी सांगितले.

गोरेगाव ड्रग्ज प्रकरणात दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने हे प्रकरण मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने घेतले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभर ड्रग्जविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया करण्याचे आदेश त्यांनी दिले. तरुणाईच्या भविष्याशी निगडित हा गंभीर मुद्दा असल्याने अशा प्रकरणांकडे अत्यंत गांभीर्याने पहावे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

कंपनीतील कथित प्रकाराबाबत फरार असलेल्या निदा खानने शनिवारी नाशिक रोड न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला, अशी माहिती तिचे वकील बाबा सय्यद यांनी दिली. सोमवारी या अर्जावर सुनावणी होणार आहे. निदा गर्भवती असून, तिच्यावर उपचार करायचे आहे, तिचा या प्रकरणाशी संबंध नाही वगैरे कारणे निदा खानने वकिलांमार्फत दिले आहेत. निदा खानच्या पतीची मुंब्रा येथे जाऊन एसआयटीने चौकशी केली होती.

# आयजींच्या पथकाची अर्धापूरात जुगार अड्ड्यावर धाड; ४ जण ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** अर्धापूरात जुगार खेळणाऱ्यांवर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाकडून धाड टाकण्यात आली. या धाडीत ४ आरोपींविरूद्ध कारवाई करून सहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

परिक्षेत्रात चालणाऱ्या अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, आपल्या अधिपत्याखालील पथकाची नांदेड जिल्हयात रवानगी केली होती. दि. १८ एप्रिल रोजी सदर पथकाने, अर्धापूर मधील उमर कॉलनीत असणाऱ्या मोकळ्या जागेत जुगार खेळणाऱ्या इसमांवर धाड टाकली असता, पथकाची चाहूल लागल्याने अनेक जुगारी पळून गेले. मात्र, त्यातील चार जुगारी पथकाच्या हाती लागले असून, त्यांच्याकडून १० हजार ३०० रुपयांची रोकड, जुगाराचे साहित्य व १२ मोटार सायकली असा एकूण ६ लाख ६० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाणे येथे गुरनं २०७/२०२६ कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास अर्धापूर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ बोदेमवाड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती ९१५०१ ००१०० हा मोबाईल क्रमांक असलेल्या खबर या हेल्पलाइन वर फोन करून अथवा व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे द्यावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# तामिळनाडूत फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट; १६ जणांचा मृत्यू, अनेकजण जखमी

**विरुधुनगर (प्रतिनिधी)–** तामिळनाडूच्या विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनारपट्टी परिसरात फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला आहे. या दुर्घटनेत किमान १६ जणांचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे. कारखान्यात कर्मचारी काम करत असताना हा स्फोट झाला. अचानक झालेल्या या स्फोटामुळे संपूर्ण परिसरात एकच गोंधळ उडाला. आग वेगाने पसरली आणि अनेक जण आतच अडकून पडले. अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आग विझवण्याचे काम सुरू केले आणि बचावकार्य हाती घेतले. अग्निशमन आणि बचाव विभागाच्या माहितीनुसार, आतापर्यंत अनेक मृतदेह सापडले असून इतरांचा शोध सुरू आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रशासनाने संपूर्ण परिसर सील केला असून स्फोट नेमका कसा झाला याची चौकशी सुरू केली आहे.

या दुर्घटनेबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांनी म्हटले की, ही घटना अत्यंत दुर्दैवी असून त्यांना यामुळे मोठा धक्का बसला आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी संवेदना व्यक्त केल्या आणि या कठीण काळात सरकार त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे सांगितले.

# आज नांदेडसह राज्यातील १९ जिल्ह्यांना येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात २० एप्रिल रोजी हवामानात मोठा बदल होण्याची शक्यता असून, राज्यातील एकूण १९ जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाकडून पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरणासह पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यामध्ये मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव विदर्भातील अकोला, अमरावती, चंद्रपूर, वाशिम, यवतमाळ उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, नाशिक पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर यासह कोकण विभागातील पालघर, ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश आहे.

# जातीय तेढ निर्माण केल्याप्रकरणी काँग्रेस नगरसेविकेच्या पतीवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या सांगवी परिसरातील जमिनीचा वाद वाढतच चालला आहे. याच वादातून काँग्रेस नगरसेविका आफिया नाज यांचे पती काजी नाफे यांच्या विरोधात शेतकऱ्याला अडवून, धार्मिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केल्या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी नगरसेविका प्रतिनिधी काझी नाफे यांच्या विरोधात स्थानिक शेतकऱ्यांनी खंडणी मागितल्याचा आरोपही केला होता.

फिर्यादी प्रल्हाद शंकर कोकाटे यांची सांगवी बु. शिवारात गट क्र. ३३६ मध्ये ६५ गुंठे जमीन आहे. या जमिनीवर कोकाटे मागील काही महिन्यांपासून प्लॉटिंग करून विक्री करत आहेत. १५ मार्च रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास कोकाटे आणि त्यांचा भाऊ आपल्या जागेवर थांबलेले असताना, प्रभाग क्र. २ तरोड्याच्या नगरसेविका प्रतिनिधी काजी नाफे तिथे आले. त्यांनी ही जमीन स्मशानभूमीची असल्याचे म्हणत प्लॉटिंगच्या कामाला विरोध केला. वडिलोपार्जित जमीन असून ही नगरसेवक प्रतिनिधीने चुकीचा दावा केला आणि दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण होईल अशा स्वरूपाचे वक्तव्य केले. धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे सांगत फिर्यादीने विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ कलम २९९, ३२९(३) आणि ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक रामदास शेडगे करत आहेत.

# ज्येष्ठ हृदयरोग तज्ञ डॉ. रामरतनसिंह बिसेन यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील ज्येष्ठ हृदयरोग तज्ञ डॉ.रामरतनसिंह उमरावसिंह बिसेन यांचे रविवार, दि. १९ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले.




त्यांच्या पार्थिव देहावर सोमवार, दि. २० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता हिंदू स्मशानभूमी, जुना मोंढा रामघाट येथे होणार आहे.

ते महानगरपालिकेचे निवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेशसिंह बिसेन यांचे वडील तसेच डॉ. देवेंद्रसिंह पालीवाल यांचे सासरे होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे.



**नांदेड** : जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास महानगर भाजपच्यावतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी खा. डॉ. अजित गोपछडे, माजी मंत्री डी.पी. सावंत, चैतन्यबापू देशमुख, महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे, माजी महापौर शैलजा स्वामी, महेश कनकदंडे, किशोर भवरे आदी दिसत आहेत. तसेच शिवसेनेकडून महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, जिल्हाध्यक्ष उमेश मुंडे, गंगाप्रसाद काकडे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस, ज्ञानेश्वर सुनेगावकर)




# कोलकाता नाईट्स रायडर्सने अखेर पहिला विजय मिळवला

**कोलकाता (प्रतिनिधी)–** कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सला चार गडी राखून पराभूत करून आयपीएल २०२६ मध्ये आपला पहिला विजय नोंदवला. केकेआरसाठी हा हंगाम चांगला गेला नाही, पण रिंकू सिंग आणि अनुकूल रॉय यांनी सातव्या विकेटसाठी भक्कम भागीदारी करून केकेआरला विजय साकारुन दिला. प्रथम फलंदाजी करताना, राजस्थानने २० षटकांत नऊ विकेट्स गमावून १५५ धावा केल्या. प्रत्युत्तरात, केकेआरने १९.४ षटकांत सहा विकेट्स गमावून १६१ धावा करत सामना जिंकला.

लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची फलंदाजी खराब झाली आणि संघाने ८५ धावांत सहा विकेट्स गमावल्या होत्या. जोफ्रा आर्चरने पहिल्याच चेंडूवर टिम सेफर्टला बाद केले आणि त्यानंतर दुसऱ्या षटकात नंद्रे बर्गरने कर्णधार अजिंक्य रहाणेला बाद केले. केकेआरचे दोन्ही सलामीवीर आपले खाते उघडण्यात अपयशी ठरले. त्यानंतर संघाने नियमित अंतराने



कॅमेरॉन ग्रीन (२७), अंगक्रिश रघुवंशी (१०), रोव्हमन पॉवेल (२३) आणि रमणदीप सिंग (१०) यांच्या विकेट्स गमावल्या.

रिंकू सिंग या मोसमात धावा करण्यासाठी झगडत होता. पण त्याला मोक्याच्या क्षणू सूर गवसला. रिंकू केकेआरसाठी फिनिशर म्हणून ओळखला जातो आणि राजस्थानविरुद्ध तो त्यात यशस्वी ठरला. सहा विकेट्स गमावल्यानंतर, रिंकू सिंगने अनुकूल रॉयसोबत मिळून सातव्या विकेटसाठी ३७ चेंडूंमध्ये ७६ धावांची नाबाद भागीदारी केली. आयपीएलमध्ये यशस्वी धाव-पाठलाग करताना सातव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावरील फलंदाजाने केलेली ही दुसरी सर्वोच्च भागीदारी आहे.

रिंकू सिंगने अर्धशतक झळकावले आणि संघाला विजय मिळवून दिल्यानंतरच तो पॅव्हेलियनमध्ये परतला. केकेआरसाठी रिंकू सिंगने ३४ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद ५३ धावा केल्या. यशस्वी धाव-पाठलागात सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना केकेआरची ही चौथी सर्वोच्च धावसंख्या आहे. दरम्यान, अनुकूल १६ चेंडूंमध्ये एक चौकार आणि दोन षटकारांसह २९ धावांवर नाबाद राहिला. राजस्थानसाठी रवींद्र जडेजाने दोन विकेट्स घेतल्या, तर जोफ्रा आर्चर, नंद्रे बर्गर, रवी बिश्नोई आणि यशराज पुंजा यांनी प्रत्येकी एकेक विकेट घेतली.

तत्पूर्वी, राजस्थानचा कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल यांनी राजस्थानला आश्वासक सुरुवात करून दिली.

# करार न मानल्यास इराणचा वीज प्रकल्प-पूल उद्ध्वस्त करण्याचा ट्रम्प यांचा इशारा



**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)–** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला नवी धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, आमचे प्रतिनिधीमंडळ पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे जाणार आहे. त्यांनी दावा केला की, त्यांनी एक नवा पारदर्शक आणि न्याय्य करार प्रस्तावित केला आहे. जर इराणने हा करार मान्य केला नाही, तर आम्ही त्यांच्या वीज प्रकल्पांना आणि पुलांना उद्ध्वस्त करू. असं सांगत ट्रम्प यांनी इराणला धमकीवजा इशारा दिला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत सांगितले की, इराणने काल होर्मुज सामुद्रधुनीत गोळीबार केला. हा आमच्या युद्धविराम कराराचा पूर्ण भंग आहे. यातील अनेक गोळ्या एका फ्रेंच जहाजावर आणि ब्रिटनच्या मालवाहू जहाजावर डागण्यात आल्या. हे चांगले नव्हते, बरोबर ना? आमचे प्रतिनिधी पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे जात आहेत. ते उद्या संध्याकाळपर्यंत तेथे पोहोचतील, जिथे चर्चा होणार आहे.ते पुढे म्हणाले, इराणने अलीकडेच होर्मुज सामुद्रधुनी बंद करत असल्याची घोषणा केली. हे विचित्र आहे, कारण आमच्या नाकेबंदीमुळे ती आधीच बंद आहे. ते नकळत आमच्याच कामी येत आहेत. हा मार्ग बंद असल्यामुळे त्यांचे दररोज सुमारे ५० कोटी डॉलरचे नुकसान होत आहे.

ट्रम्प यांनी पोस्टमध्ये पुढे लिहिले, अमेरिकेला यामुळे कोणतेही नुकसान होत नाही. उलट अनेक जहाजे अमेरिकेकडे येत आहेत. टेक्सास, लुइझियाना आणि अलास्का येथे तेल भरण्यासाठी ती येत आहेत. हे सर्व आयआरजीसीच्या कृपेने घडत आहे, जे नेहमीच स्वतःला 'शक्तिशाली' दाखवण्याचा प्रयत्न करतात.ते पुढे म्हणाले, आम्ही अतिशय निष्पक्ष आणि न्याय्य करार देत आहोत. मला आशा आहे की ते तो स्वीकारतील. कारण जर त्यांनी तो स्वीकारला नाही, तर संयुक्त राज्य अमेरिका इराणमधील प्रत्येक वीज प्रकल्प आणि प्रत्येक पूल उद्ध्वस्त करेल, असे त्यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बँका जबाबदारी का झटकतायेत?

नुकतेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मांडलेला 'झिरो लायबिलिटी' (शून्य जबाबदारी) हा सिद्धांत ग्राहक संरक्षणाचा महत्त्वाचा आधारस्तंभ ठरला आहे. मात्र, या तत्त्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होताना बँकांकडून दिसणारी अनास्था चिंताजनक आहे. कारण डिजिटल बँकिंगच्या युगात व्यवहार अधिक वेगवान, सोपे आणि सुलभ झाले असले तरी सायबर फसवणुकीचे संकटही तितक्याच वेगाने वाढत आहे. ऑनलाईन व्यवहारांमुळे आर्थिक व्यवहारांचा विस्तार झाला, परंतु त्याचबरोबर ग्राहकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. ६ जुलै २०१७ रोजी रिझर्व बँकेने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, जर ग्राहकाने फसवणुकीची माहिती तीन कार्यदिवसांत दिली आणि त्याच्याकडून कोणताही गंभीर निष्काळजीपणा (उदा. पासवर्ड शेअर करणे) झाल्याचे पुरावे नसतील, तर आर्थिक नुकसानाची जबाबदारी ग्राहकांवर येत नाही. परंतु प्रत्यक्षात बँका अनेकदा ओटीपी अर्थात एकदाच वापरावयाचा पासवर्ड याच्या वापराचा दाखला देत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतात. यामुळे ग्राहकांचा विश्वास डळमळीत होण्याची शक्यता वाढते. याच पार्श्वभूमीवर, एका ग्राहकाचे सुमारे ३८ लक्ष रुपये चोरट्याने काढून घेतले. या संदर्भात बॉम्बे उच्च न्यायालयाचा निकाल अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आश्चर्याची बाब म्हणजे लाभार्थी जोडणे आणि व्यवहार मर्यादा वाढविणे यासारखे महत्त्वाचे बदल प्रभावी सूचना किंवा सुरक्षा पडताळणीशिवाय झाले. फसवणूक लक्षात येताच ग्राहकाने तत्काळ बँकेला कळवले, पोलिसांत तक्रार केली आणि रिझर्व बँक व बँकिंग लोकपालकडेही धाव घेतली. तरीही संबंधित बँकेने ओटीपी-आधारित व्यवहार असल्याचे सांगत जबाबदारी नाकारली. पोलीस तपासात मात्र धक्कादायक बाब समोर आली. बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करणाऱ्यांनी डुप्लीकेट सिमकार्ड मिळवले आणि ओटीपी त्या नव्या सिमवर वळवण्यात आले. यामुळे ग्राहकाचा कोणताही निष्काळजीपणा नसल्याचे स्पष्ट झाले. न्यायालयाने बँकेचा बचाव फेटाळत स्पष्ट केले की, केवळ ओटीपी पडताळणी ही जबाबदारी ठरविण्याचा अंतिम निकष ठरू शकत नाही. परिणामी, बँकेला ३८.०४ लाख रुपये व्याजासह परत करण्याचे आदेश देण्यात आले. अशाच प्रकारच्या अनेक प्रकरणांत न्यायालयांनी ग्राहकांच्या बाजूने ठाम भूमिका घेतली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने देखील स्पष्ट केले की, फिशिंगसारख्या सायबर फसवणुकीत संपूर्ण जबाबदारी ग्राहकावर टाकणे योग्य नाही. विशेषतः जेव्हा बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेत त्रुटी आढळतात. केरळ उच्च न्यायालयाने नमूद केले की, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या सायबर गुन्ह्यांपासून सामान्य ग्राहकांनी स्वतःचे संरक्षण करणे अवघड आहे. असे अनेक निर्णय विविध प्रकरणांमध्ये विविध न्यायालयाने दिले आहेत. या सर्व निर्णयांचा एकत्रित विचार केल्यास स्पष्ट होते की, न्यायव्यवस्था ग्राहक संरक्षणाला प्राधान्य देत आहे आणि 'झिरो लायबिलिटी' हा केवळ मार्गदर्शक तत्त्व न राहता कायदेशीर हक्क म्हणून विकसित होत आहे. मात्र, तरीही बँकांचा दृष्टिकोन बदललेला दिसत नाही. त्यांच्यामध्ये ओटीपी वापराचा आधार घेत जबाबदारी नाकारण्याची प्रवृत्ती अद्याप कायम आहे. असे असले तरी ग्राहकाने देखील पूर्ण सावधगिरीनेच आर्थिक व्यवहार केला पाहिजे हे तेवढेच खरे आहे. केवळ न्यायालयाने अशा प्रकारचे आदेश दिले असल्यामुळे आपण सुरक्षित आहोत असे समजण्याचे काही कारण नाही. आपल्या व्यवहारांमध्ये अगदी पावला-पावलांला अशा प्रकारची फसवणूक होत असते. सावधगिरी बाळगणे हे ग्राहकाचे पहिले कर्तव्य आहे. कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील बँकातील व्यवहारावर अवलंबून असते आणि बँकेवर लोकांचा विश्वास जोपर्यंत असतो तोपर्यंतच हा विकास चालू राहतो अन्यथा बांगलादेश आणि पाकिस्तान सारखी अवस्था व्हायला वेळ लागत नाही. म्हणूनच डिजिटल अर्थव्यवस्थेवर विश्वास टिकवून ठेवायचा असेल, तर बँकांनी आपल्या सुरक्षा यंत्रणेत सुधारणा करणे आणि ग्राहक-केंद्रित दृष्टीकोन स्वीकारणे अत्यावश्यक आहे. रिझर्व बँक, इतर बँका आणि न्यायव्यवस्था यांच्यात समन्वय साधून 'झिरो लायबिलिटी' तत्त्वाची काटेकोर अंमलबजावणी झाली, तरच 'डिजिटल इंडिया' सुरक्षित, विश्वासार्ह आणि सक्षम राहू शकेल, यात शंका नसावी.

# पाणी म्हणजे जीवन



आपण सुरुवातीपासूनच पाणी साठवत आलो आहोत. परंतु आधुनिक जीवनशैलीने नैसर्गिक स्त्रोतांच्या संवर्धनाची जबाबदारी केवळ काही स्वयंसेवी संस्था आणि सरकारांपर्यंतच मर्यादित करून टाकली आहे. पाणी, हवा, जमीन किंवा इतर नैसर्गिक संसाधनांनाही मर्यादा असतात आणि ते कायम टिकणारे नाहीत, हे माहीत असूनही त्याची आपल्याला अजिबात चिंता वाटत नाही वास्तविक आपल्याला जर काही शिकून घ्यायचं असेल तर आपण आपल्या इतिहासात डोकावून पाहायला हवं. आदी युगात आपल्याकडे पुरेसे पाणी होतं, तरीही त्या काळात जलसंधारणाची पुरेशी व्यवस्था केली गेली होती आणि त्याच पद्धतींमध्ये थोडा बदल करून आज आपण पाण्याच्या समस्येपासून मोठ्या प्रमाणात मुक्त होऊ शकतो. जलसंधारणाच्याबाबतीत भारताला एक उत्कृष्ट इतिहास आहे. येथे जल संवर्धनाची एक मौल्यवान पारंपरिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे, जी केवळ ओळखली जाण्याचीच नाही, तर ती आपण अंगीकारलीही जाण्याची आहे.

वैदिक कालखंडात पाण्याची साठवण नैसर्गिक आणि कृत्रिम अशा दोन्ही प्रकारे केली गेली. सध्याची परिस्थिती पाहिली तर पाण्याचे व्यवस्थापन हे देशाच्या अर्थव्यवस्थेशी आणि सामाजिक व्यवस्थेशी निगडित आहे. यावर कृषी, औद्योगिक आणि तांत्रिक प्रगती अवलंबून आहे. भारतातील भूजल जलविज्ञानाचा विकास पाच हजार वर्षांहून अधिक जुना आहे. वैदिक साहित्यात याचा पुरावा आहे. त्यामध्ये इंद्र, वायु, अग्नि इत्यादि विविध देवतांची श्लोक, सूत्र आणि स्तुती म्हणून पूजा केली जाते. प्राचीन भारतीय संस्कृतीत 'पाणी म्हणजे जीवन आहे' हे सिद्धांत मांडले गेले आहेत. वैदिक साहित्यात वारंवार पाण्याचे स्रोत, पाण्याचे महत्त्व, तिची गुणवत्ता आणि संवर्धनाविषयी वारंवार चर्चा केली गेली आहे. वैदिक कालखंडात पाण्याचे व्यवस्थापन मोठ्या आणि अत्यंत चांगल्या पद्धतीने केले जात असे. चरक संहितामध्ये भूगर्भातील पाण्याच्या गुणवत्तेचीही चर्चा आहे. बृहत संहितेच्या चौपन्नाव्या अध्यायात झाडे, प्राणी, जमीन आणि खडकांशी संबंधित विशेष संकेतक व विहिरी खोदण्याच्या पध्दतीचे वर्णन आहे, ज्यामुळे जमिनीखाली पाणी प्रकट होते. निसर्गात अशी काही झाडे आहेत, जी जमिनीखाली पाणी असल्याबाबत माहिती देतात. आजचे पर्यावरणीय विज्ञान आणि वराहमिहीरचे पारंपारिक विज्ञान यांच्यातही एक संबंध आहे. निसर्गाने पृथ्वीवर एकाहत्तर टक्के पाण्याची व्यवस्था केली आहे. एवढेच नाही तर आपल्या शरीराचा सदुसष्ट टक्के भाग पाण्याने व्यापला आहे.

पाणी ही जीवनासाठी सर्वात महत्वाची गोष्ट आहे. पण आज त्याचे स्रोत कमी होत आहेत. आज जगाला सुरक्षित आणि ताज्या पाण्याच्या स्त्रोतांची गरज आहे. पिण्याचे पाणी आणि स्वच्छता, सुविधा, आरोग्याचे रक्षण या गोष्टी मूलभूत गरजांपैकी एक आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा आणि स्वच्छता हे सर्व लोकांच्या आरोग्यासाठी आणि विकासाच्या समस्यांसाठी राष्ट्रीय आव्हान बनले आहे. भूगर्भातील पाण्याच्या गुणवत्तेतही सातत्याने घट होत आहे. एका अंदाजानुसार, दूषित पाणी देशातील चौदा लाखांपेक्षा जास्त गाव-वस्त्यांमध्ये पोहोचते आहे. प्रश्न असा आहे की या लोकांना शुद्ध पाणी कसे मिळणार? इतर देशांप्रमाणेच भारतातील पाण्याचे संकटही गंभीर आहे. पारंपारिक जल स्त्रोत जसे की तलाव आणि सरोवरे जलद शहरीकरणामुळे नष्ट झाले आहेत. होत आहेत. केंद्रीय भूजल मंडळाने विविध राज्यांमध्ये केलेल्या सर्वेक्षणातून हेही स्पष्ट झाले आहे की, या राज्यांची भूजल पातळी वर्षाकाठी वीस सेंटीमीटर दराने कमी होत आहे. भारतात सध्या दरडोई पाण्याची उपलब्धता दोन हजार घनमीटर आहे. परंतु जर परिस्थिती तशीच राहिली तर पुढील दोन दशकांत पाण्याची उपलब्धता दर व्यक्ती एक हजार पाचशे घनमीटरपर्यंत कमी होईल. एक हजार सहाशे ऐंशी घनमीटरपेक्षा कमी पाण्याची उपलब्धता म्हणजे धोकादायक परिस्थिती हे लक्षात घ्यायला हवे.

भूगर्भातील पाण्याच्या अतिवापरामुळे पारंपारिक पाण्याचे स्त्रोत कोरडे होत आहेत. पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी ९७.५ टक्के पाणी समुद्री आहे. हे समुद्री पाणी खारट असल्याने आमच्यासाठी निरुपयोगी आहे. उर्वरित अडीच टक्के पाणी गोड आहे. परंतु त्यातील चोवीस दशलक्ष घन किलोमीटर भूगर्भातील पाणी सहाशे मीटर खोलीवर अस्तित्त्वात आहे आणि सुमारे पाच लाख घन किलोमीटर पाणी अशुद्ध आणि प्रदूषित झाले आहे. म्हणजेच पृथ्वीवर असणाऱ्या एकूण पाण्यापैकी केवळ एक टक्का पाणी उपयुक्त आहे. जगातील आठ अब्ज लोकसंख्येसह सर्व प्राणी आणि वनस्पती जगताला या एक टक्का पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहेत. सिंचन, शेती आणि सर्व उद्योग या गोष्टी गोड्या पाण्यावर चालतात. साहजिकच, आगामी काळात पाण्याचे संकट अधिक गंभीर रूप धारण करणार आहे. यामुळे देशात अन्न-धान्याचे संकट निर्माण होईल, उद्योग संपतील, स्थलांतर, बेरोज-गारी वाढेल व परस्पर संघर्षांना चालना मिळेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल. भारतात जगातील एकूण गोड्या पाण्यांपैकी अडीच टक्के पाणी उपलब्ध आहे, त्यातील एकोणनव्वद टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते.

सध्याला देशातील सर्व भागात जल व्यवस्थापनविषयक कामेतातडीने सुरू करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला कृषी क्षेत्रापासून सुरुवात करावी लागेल, कारण शेतीमध्ये पाण्याचा वापर सर्वाधिक प्रमाणात केला जातो. पाण्याचा गैरवापर ही सिंचनाची गंभीर समस्या आहे. सामान्य धारणा अशी आहे की जास्त पाणी वापरल्यावर जास्त उत्पन्न मिळते, जे खरेतर चुकीचे आहे. पिकाच्या उत्पादनात सिंचनाचा वाटा पंधरा-सोळा टक्के आहे. ठिबक सिंचन, तुषारसिंचन तंत्रांचा आणि शेतातील सपाटीकरण यांद्वारे पाण्याचा गैरवापर किंवा नासाडी रोखता येते. पिकांना जीवन-रक्षक किंवा पुरक सिंचन देऊन उत्पन्न दुप्पट करता येते. यासाठी आणखीही काही प्रयोग करता येतील. मोठ्या आणि छोट्या सर्व कृषी क्षेत्रासाठी तलाव किंवा पाण्याचे साठे तयार करणे आवश्यक आहे. गाव पातळीवर मोठ्या तलावाचे बांधकाम करणे गावासाठी उपयुक्त आहे, यामुळे भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होईल. पावसामुळे देशातील सुमारे पंचाहत्तर टक्के भूगर्भातील पाण्याची कमतरता दूर करता येते. देशातील वेगवेगळ्या पर्यावरणीय झोननुसार अंदाजे ३० दशलक्ष हेक्टर पाण्याचा साठा केला जाऊ शकतो. शेतीनंतर उर्वरित अकरा टक्के पाणी मानवी वापरासाठी आणि उद्योगांसाठी वापरले जाते.

भारत पाण्याचा जागतिक स्त्रोतांचा सर्वात मोठा ग्राहक आहे. संपूर्ण जगात भारतात पाण्याचा सर्वाधिक वापर करण्याचे प्रमाण तेरा टक्के आहे. भारतानंतर चीन बारा टक्के आणि अमेरिका नऊ टक्के वापरतो. एका अहवालानुसार, २०५० पर्यंत अनेक भारतीय नद्यांना पाणी संकटाचा सामना करावा लागणार आहे. दरवर्षी पाऊस आणि बर्फातून वाहणाऱ्या नद्यांमधून भारताला सरासरी चार हजार अब्ज घनमीटर पाणी मिळते. भारतात साडेचार हजाराहून अधिक धरणे असून यांची साठवण क्षमता दोनशे वीस अब्ज घनमीटर आहे. यात लहान सहान जलस्रोतांचा समावेश नाही. ज्यांची क्षमता ८१० अब्ज घनमीटर इतकी आहे. तरीही आमची दरडोई साठवण क्षमता ऑस्ट्रेलिया, चीन, मोरोक्को, दक्षिण आफ्रिका, स्पेन आणि अमेरिकेपेक्षा खूपच कमी आहे. तसेच प्राणी जगतासाठीही पाणी आवश्यक आहे. म्हणूनच, नैसर्गिक स्त्रोत नष्ट होऊ नयेत, म्हणून काळजी घेतली पाहिजे. पर्वत, जलस्रोत आणि वने यांना एकाच सूत्रात बांधले जाणे फार महत्वाचे आहे. त्यातूनच जलसंधारण शक्य आहे. म्हणूनच जंगले आणि नद्या वाचविणे आवश्यक आहे, कारण या दोन्हींमुळेच पिण्याचे पाणी आणि पुरेसे शुद्ध वातावरण उपलब्ध होणार आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# आता तेवढं ऊन नाही?

आज ऊन फारच तापू लागले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तापमानाचा आकडा उच्चांक गाठत आहे. अशातच त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होवू लागला आहे. परंतु तरीही विद्यार्थ्यांना आज सुट्ट्या लागलेल्या नाहीत. त्यामुळं याच उष्णतेची लाट लक्षात घेवून शासनाने नागपूर येथे दि. १८ एप्रिल २०२६ ला एक दिवस सरकारी सुट्टी जाहीर केली. त्याचा अर्थ होता, विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होवू नये. मात्र पूर्वी असं नव्हतं. शाळा जरी मे महिन्यापर्यंत असल्या तरी विद्यार्थ्यांना मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुट्ट्या लागून जात असत. ज्यातून विद्यार्थी वर्गाला उन्हाळ्याचा फारसा त्रास होत नव्हता. तसं पाहिल्यास आजही तेवढं ऊन नाहीच आणि कालंही तेवढं ऊन नसायचंच. कारण ऊन कितीही असलं तरी शेतावर राबणारे शेतकरी भर उन्हात शेतात काम करायचे. मजूर वर्गही भर उन्हात कामावर काम करायचे. कारखान्यात राबणारे कामगार भट्टीजवळ भर उन्हाळ्यात काम करायचे. एवढंच नाही तर काही काही लोकंही भर उन्हात प्रवास करायचे. अशावेळेस त्या एसीच्या गाड्या नसायच्या. आजही तीच परिस्थिती आहे. परिस्थिती फक्त श्रीमंतांसाठीच तेवढी बदललेली आहे. कालही गरीब, सामान्य वर्ग व त्यांच्या मुलांना सुख नव्हतंच. आजही गरीब व सामान्य वर्गांतील लोकांना सुख नाहीच. ते हात आजही राबराब राबतच असतात. मग ते तप्त ऊन असो की, कोणतेही नैसर्गिक संकट. त्यांना फारसा फरक पडत नाही. शिवाय कालच्या मार्च महिन्यात दोन महिन्यासाठी बंद होणाऱ्या शाळा आजही तप्त उन असलं तरी सुरु आहेत. कारण आज ज्या श्रीमंत वर्गातील लोकांना फरक पडतो. ती मंडळी एसीत वावरतात व त्यांची मुलंही कॉन्व्हेंटच्या शाळेत शिक्षण घेत आहेत. ज्या शाळेतील वर्गखोल्यातच एसीची व्यवस्था केल्या गेली आहे. ती सोय सरकारी अनुदानीत शाळेत नाही. तरीही मुलं येतात. कारण त्यांना तेवढं उन वाटत नाही, आपल्या कर्तव्यापुढं. कारण कर्तव्यापुढं कोणतंच संकट नसतं. मग ते तप्त उन का असेना. तप्त उनही संकट बनून विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या कर्तव्यापुढं त्यांचा अडसर बनत नाही.

सध्या उन्हाळ्याचा हंगाम सुरु आहे व सुर्य आग ओकत आहे. अशा काळात रस्त्यावरुन चालतो म्हटल्यास उन अंगाला झोंबतं. हा काळ तप्त असा असून याची चाहूल माणसांना तर लागलीच. परंतु पक्ष्यांनाही लागलेली असून त्यांनी गर्द झाडाच्या सावलीत आश्रय घेतलेला दिसून येत आहे. पारा दिवसेंदिवस वाढत चाललेला असून आता संपुर्ण रस्ते ओसाडसारखे वाटत आहेत.

रस्ते ओसाड? आश्चर्यात टाकणारा प्रश्न? रस्ते ओसाड नाहीतच. कारण अलिकडील काळात भर दुपारीही रस्त्यावरुन वाहने चालतात. कारण असतं गाडीत असलेला एसी. गाडीत एसी असल्यानं आत अतिशय थंड वातावरण असतं व बाहेरील उन्हाचा चटका हा शरीराला झोंबत नाही, कितीही मग उन असलं तरी. मात्र घरी राहणाऱ्या लोकांची त्रेधातिरपीट उडते. घरी राहणाऱ्या लोकांमध्ये तीन प्रकारची लोकं राहतात. पहिला वर्ग अतिशय गरीब वर्ग. जो झोपड्यात राहतो. ज्यांच्याकडे कुलर किंवा पंखा लावायलाही पैसे नसतातच. ते उन्हाळ्याच्या दिवसात चक्क घराच्या बाहेरच झोपतात. त्यांचा रक्षणकर्ता हा विधाताच असून ते अंधाऱ्या रात्रीही जमीनीवर झोपत असतात. ज्या जमिनीवर झोपल्याने साप, वा इतर सरपटणाऱ्या प्राण्यांपासून शरीराला भीती असते. त्यांनाही उन्हाळ्याचा त्रास होतोच. परंतु उपाय नसतो.

दुसरा वर्ग आहे, सामान्य जनता. ज्यांच्याकडे कुलर व पंखे असतातच, उन्हाळ्याच्या उष्णतेपासून वाचण्यासाठी. परंतु अलिकडील उन्हाळ्यात एवढं उन वाढतं की कुलर व पंखे कामच करीत नाहीत.

तिसरा वर्ग आहे, श्रीमंत लोकांचा. त्यांना उन्हाळ्याचा काहीच त्रास नसतो. कारण त्यांच्या घरी एसी असतो. उन्हाळा तापतो व अशा काळात उन्हाचा त्रास होवू नये म्हणून शाळेला सुट्ट्याही असतात. त्यातच शाळेत विद्यार्थीच नाही म्हणून शिक्षकांनाही सुट्ट्या असतात. मात्र सरकारी कार्यालये सुरु असतात. कारण त्यांना उन लागत नाही असं सरकारचं गृहितक आणि ते बरोबरही आहेच. कारण सरकारचे सरकारी कर्मचारी हे चार भिंतींच्या आत कुलर वा एसीत बसलेले असतात.

उन्हाळा लागला की श्रीमंत पालकांची ओरड असते. त्यामूळं अशा लोकांच्या आग्रहाखातर उन्हाळ्यात शाळा बंदच असतात. हे आपण पुर्वीपासूनच पाहिले. उन्हाळ्यातील दाह व तप्त उन लक्षात घेता, पुर्वी मार्च महिन्यातच विद्यार्थ्यांना सुट्ट्या लागत असत. शिक्षक वर्ग तेवढा शाळेत येत असे. त्यावेळेस तेवढं उन नसायचंच. तरीही सरकार ती सोय विद्यार्थ्यांना अपाय होवू नये म्हणून करायचे. परंतु आता तसं नाही. आता सरकारला वाटते की या लहान कोवळ्या कळ्यांना उन लागत नाही.



ती सहनशील आहे. म्हणूनच काल मार्च महिन्याच्या अखेरीस लागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुट्ट्या लक्षात घेवून त्यात एक महिना वाढ केल्या गेली आहे. ज्यातून आता विद्यार्थी एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत शाळेत जातात आणि तिकडे जुन महिन्याच्या सव्वीस तारखेला सुरु होणारी शाळा पंधरा वा बारा जूनला सुरु होणार आहे. यावरुन सरकारला विद्यार्थ्यांच्या हक्काच्य् सुट्ट्या रद्द करायच्या आहेत व हवाला द्यायचा आहे की पुर्वी जास्त उन तप्त असायचं. आता तशी परिस्थिती नाही.

उन तपतं. पुर्वीपेक्षा आता जास्तच तपतं. परंतु त्याची झळ सरकारला पोहोचत नाही. सरकारच्या कर्मचाऱ्यांना पोहोचत नाही. त्याचं कारण आहे, त्यांचं एसीच्या चारचाकी गाडीत कार्यालयापर्यंत जाणं आणि कार्यालयातही एसी वा कुलरच्या हवेत बसणं. परंतु त्या तप्त उन्हाचा त्रास विद्यार्थ्यांना होतोच. कारण ते एसीच्या गाडीत बसून शाळेत जात नाहीत, ना ही ते शाळेतील वर्गखोल्यात एसी वा कुलरच्या हवेत बसत नाही. बऱ्याच शाळेत विद्यार्थ्यांना जिथे शौच करण्यासाठी शौचालये नाहीत. तिथं बसायलाही नीट वर्गखोल्या नसतातच. एसी वा कुलर दूरच राहिला. अशा शाळेत विद्यार्थ्यांना अकरा वाजेपर्यंत बसणं फारच कठीण होवून जातं. शिवाय काही काही तुघलकी शाळा अशाही आहेत की त्या शाळेत सरकारचा नियत तापमानाच्या अनुषंगाने असलेला अकरा वाजेपर्यंतचा वेळ न पाळता अशा शाळा या भर दुपारी बारा, साडेबाराला सुट्टी देतात. यात मुख्याध्यापक संस्थाचालकाचा व संस्थाचालक मुख्याध्यापकांचा हवाला देवून आपली जबाबदारी पार पाडत असतात. परंतु हे त्यांचे तुघलकी वागणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवाशी व तेथील कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळणेच असते. यातूनच कधीकधी तप्त उन्हाचा त्रास होवू नये म्हणून एक दिवस शाळा बंद ठेवली जाते. खरंच उन्हाळा असा विचार करेल काय की एक दिवस सरकारनं विद्यार्थ्यांना त्रास होवू नये म्हणून शाळा बंद ठेवली. हे माझ्यामुळं घडलं. मी उद्यापासून तापणार नाही. उन्हाळा तसा विचार करणार नाही. तो दररोज आपले कार्य करेलच. हीच बाब लक्षात घेवून एका तालुक्यातील कर्मचाऱ्याना त्यांच्या अधिकारी वर्गानं म्हटलं की आपण सरकारी कामावर नियुक्त आहात. हे उन्हाळ्यालाही समजते. आपण सरकारचंच काम आणि तेही राष्ट्रीय कर्तव्य करीत आबात. हेही उन्हाळ्याला समजते. तेव्हा हा उन्हाळा तीच बाब लक्षात घेवून तापला तरी आपणाला त्रास देणार नाही. तो अधिकारी व त्या अधिकाऱ्याचं ते बोलणं. ज्यातून कर्मचारी वर्गांना उन असो की पाऊस, कोरोना असो की एखादी नैसर्गिक आपत्ती. मग मृत्यू पुढे असो की एखादी दुर्दैवी गोष्ट. काम करावंच लागतं. त्यांच्यासाठी उन्हाळ्याचं उन तेवढं तीव्र नसतंच.

आज उन फारच तापू लागले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तापमानाचा आकडा उच्चांक गाठत आहे. अशातच त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होवू लागला आहे. परंतु तरीही विद्यार्थ्यांना आज सुट्ट्या लागलेल्या नाहीत. मात्र पुर्वी असं नव्हतं. शाळा जरी मे महिन्यापर्यंत असल्या तरी विद्यार्थ्यांना मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुट्ट्या लागून जात असत. ज्यातून विद्यार्थी वर्गाला उन्हाळ्याचा फारसा त्रास होत नव्हता. आज तसं नाही. पुर्वी जेवढं उन तपायचं. तेवढं उन आज तापत नाही. आज त्याचेपेक्षा जास्त उन तापतं व अशा काळात शाळा या कालच्यासारख्याच मार्च महिन्यात बंद व्हायला हव्यात. त्या होत नाही. पर्यायानं सांगायचं झाल्यास लहान मुलं ही कोवळ्या मनाची मुलं असतात. त्यांची त्वचा ही जास्त उष्णतेची लाट सहन करणारी नसतेच. तेव्हा उन्हाळ्यातील उष्णतेचा त्यांच्यावर फार मोठा परिणाम होतो. हे लक्षात घेवून शासनानं एप्रिल महिन्यात शाळा ठेवून त्यांच्या जीवाशी खेळू नये. त्यातच त्यांनी त्यांना उत्तम आरोग्य प्रदान करता यावं म्हणून प्रयत्न करावा. त्यासाठी शाळेला विद्यार्थी हित लक्षात घेऊन मार्च महिन्याच्या शेवटपर्यंत सुट्ट्या घोषीत कराव्यात. जेणेकरुन एप्रिल महिन्यात वाढलेल्या उष्णतेचा दाह त्यांना सहन करावा लागू नये.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याचा अंदाज हा धोक्याचा इशारा



स्कायमेट या खाजगी संस्थेनंतर आता भारतीय हवामान खात्यानेही यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. देशात सरासरी ८७ सेंटीमीटर पाऊस पडतो. सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के पाऊस सर्वसाधारण मानला जातो. जून ते सप्टेंबर या महिन्यात सरासरीच्या ९४ टक्के पाऊस पडेल अशी शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे तर स्कायमेट या संस्थेने यावर्षी सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे याचाच अर्थ दोन्ही संस्थेने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे.

अलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला जात आहे. केवळ भारतातच नाही तर जगातील अनेक देशात कमी पाऊस पडेल असाही अंदाज स्कायमेटने वर्तवला आहे. महाराष्ट्रात देखील सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकणासह मध्य महाराष्ट्र अंक विदर्भात सगळीकडे सामान्यापेक्षा कमी पाऊस राहणार आहे. पॅसिफिक महासागरात सक्रिय असलेल्या अल निनोमुळे ऑस्ट्रेलिया, दक्षिण आशिया व भारताच्या काही भागात दुष्काळ पडण्याची भीतीही या अंदाजात वर्तवण्यात आली आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार आहे याचाच अर्थ ८७ सेंटीमीटरपेक्षा कमी पाऊस पडणार आहे.

कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या आपल्या देशात हवामानाचा अंदाज खूप महत्वाचा ठरतो. भारतातील शेती पावसावर अलवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे आकाशाकडे लागलेले असतात. शेतीचं देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान १४ टक्के असते, तरी देशातील ७० टक्के रोजगार हे शेतीवर अवलंबून आहेत. जून ते सप्टेंबर या कालावधीत कमी पाऊस पडणार असला तरी पावसाचे आगमन वेळीच होणेही तितकेच महत्वाचे आहे. जर पावसाचे आगमन लांबले तर बळीराजाने केलेली पेरणी वाया जाते. पेरणी वाया गेली तर दुबार पेरणीचे संकट उभे राहते. शिवाय परतीचा पाऊसही महत्वाचा आहे. परतीचा पाऊस धुमाकूळ घालतो त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाते असेच चित्र आपण मागील काही वर्षांपासून पाहत आहोत. सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आणि त्यात जर पावसाचे आगमन लांबले किंवा परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला तर हे वर्ष बळीराजासाठी जिकरीचे ठरू शकते. आधीच अवकाळी पावसाने कंबरडे मोडलेला बळीराजा स्कायमेट आणि हवामान खात्याच्या या अंदाजामुळे आणखी निराश झाला आहे.

यंदा पुरेसा पाऊस झाला नाही, तर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या बळीराजासाठी हा मोठा धक्का असेल. स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरला, तर देशाची अर्थव्यवस्थाच कोलमेडल. पाऊस कमी झाला तर महागाई वाढेल. शिवाय पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल. यावर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पाणी जपून वापरावे लागणार आहे. आहे त्या पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. यावर्षी देशाला उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागेल असा हवामान खात्याचा अंदाज खरा ठरताना दिसत आहे. उष्णतेच्या लाटेचा परिणाम जलसाठ्यावर होणार आहे. उष्णतेप्रमाणेच कमी पावसाचा अंदाज जर खरा ठरला देशात पुन्हा दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण होऊ शकते. चार पाच वर्षांपूर्वी आपण दुष्काळाची दाहकता अनुभवली आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना दाही दिशा फिरावे लागत होते. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती ती स्थिती पुन्हा उदभवू द्यायची नसेल तर प्रशासनाने पाणी वाटपाचे आत्तापासूनच योग्य नियोजन करायला हवे. लोकांनीही त्याला साथ द्यायला हवी. पाणी वाया न घालवता पाण्याची बचत करून संभाव्य पाणीटंचाईला तोंड देता येऊ शकेल. एकूणच कमी पावसाचा स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याचा अंदाज भारतासाठी धोक्याचा इशारा आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पालकमंत्र्यांकडून विविध योजनांचा सविस्तर आढावा

## शेतकरी हित, आरोग्य सेवा व निधी वापरावर भर



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर आढावा घेतला. यामध्ये मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, आयुष्यमान भारत कार्ड योजना, पाटबंधारे विभागाचे प्रकल्प तसेच जिल्हा नियोजन निधीचा विनियोग यांचा समावेश होता.

बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला पालकमंत्री सावे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेचा आढावा घेतला. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. शासनाचे धोरण शेतकरी हिताला प्राधान्य देणारे असून त्यांच्या समस्या तत्काळ सोडविण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी नमूद केले. यावेळी योजनेच्या अंमलबजावणीतील यंत्रणा, निधी उपलब्धता, महसूल, पोलीस, भूमिअभिलेख व ग्रामपंचायत यांची जबाबदारी तसेच कार्यपद्धती याबाबत उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर यांनी सादरीकरण केले.

आरोग्य विभागाच्या आढाव्यात प्रधानमंत्री जन-आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत आयुष्यमान कार्ड वितरणासाठी जिल्ह्यातील विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. या योजनांचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा यासाठी व्यापक जनजागृती करण्यावर भर देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. आजारांच्या कव्हरेजची संख्या १२०० वरून २४०० पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती सर्व माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबाबतही त्यांनी सूचना केली.

पाटबंधारे विभागाच्या कामांचा आढावा घेताना लेंडी धरणासह उर्ध्व पैनगंगा व सहस्त्रकुंड प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती घेतली. मागील वर्षी लेंडी धरणाच्या पाण्यामुळे बाधित झालेल्या प्रसंगाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक ती कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणाची कामे चालू आठवड्यात पूर्ण करण्यावरही त्यांनी भर दिला.

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विविध विभागांनी मंजूर निधीची मागणी उशिरा केल्याने काही विभागांचा निधी खर्च न होता तसाच शिल्लक राहिला. त्यामुळे सदर निधी व्यपगत झाल्याने पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित विभागांनी समन्वय ठेवून काम केले असते तर हा निधी व्यपगत झाला नसता, असे त्यांनी स्पष्ट केले. यापुढे निधी वेळेत खर्च करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करावी, असेही निर्देश दिले. परत गेलेल्या निधीबाबत संबंधित विभागांकडून खुलासे मागवून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# नांदेडचा मथुरा- लभान गोवंश महाराष्ट्राचे पशुवैभव

## पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते प्रा. डॉ. पंडित नांदेडकर यांचा गौरव



**नांदेड (प्रतिनिधी)–** पशुवैद्यक महाविद्यालयाचे प्रा. डॉ. पंडित नांदेडकर यांना हरियाणातील करनाल येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेत 'मथुरा-लभान गोवंश : महाराष्ट्राचा अभिमान' या विषयावरील सादरीकरणासाठी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक नुकतेच मिळाले. या यशाबद्दल नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते त्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात गौरव करण्यात आला.

पालकमंत्री अतुल सावे यांनी पशुसंवर्धन विभाग, परभणी पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक व पशुपालक यांना मथुरा लभान गोवंश संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, डॉ.प्रवीणकुमार घुले व अधिकारी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. नांदेडकर यांनी नांदेड जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीद्वारे 'मथुरा लभान गोवंशास राष्ट्रीय स्तरावर मान्यता देण्यासाठी हाती घेतलेल्या प्रकल्पाची माहिती व त्यासंदर्भात किनवट तालुक्यात चालू असलेल्या कार्याचा आढावा सादर केला.

डॉ. नांदेडकर यांनी मथुरा-लभान गोवंशाचे प्रजनन क्षेत्र हे महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यातील किनवट, माहूर, हिमायतनगर, भोकर तालुक्यांमध्ये तसेच लगतच्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये आढळून येते. मथुरा-लभान गोवंश हा मथुरा, लभानी व बंजारा समुदायाकडे ३०० पेक्षा अधिक वर्षापासून असल्याचे समजते. या गायी बहुतांशी पांढऱ्या रंगाच्या असून क्वचितच हलक्या राखेरी रंगामध्ये पहावयास मिळतात. त्वचा चमकदार व शरीराला घट्ट चिटकलेली असते. डोळे काळे व पाणीदार असतात. कपाळ रुंद व सपाट असते. चेहरा निमुळत्या आकाराचा असतो. सदर गायी या मध्यम बांध्याच्या असून शिंगे बाहेरच्या दिशेने वर जाऊन पुन्हा आतल्या बाजूने वळलेले असतात. कान मध्यम आकाराचे असून बाहेरील पृष्ठभाग राखाडी रंगाचा असतो. दोन्ही पायांमधील छातीचा भाग अरुंद असतो. छाती पोळ मध्यम आकाराची लटकलेली असते. शेपटी पायाच्या घोट्यापर्यंत लांब असून शेपटीचा गोंडा काळा व झुपकेदार असतो. गायीमध्ये कास मध्यम आकाराची शरीरास घट्ट चिकटलेली असून दुधाची शीर ठळक व सरळ असते. स्तन हे दंडगोलाकार असतात. गायी साधारणतः दिवसाकाठी १.५ - २ लिटर दूध देतात. या गायीचे तुपास अतिउच्च मागणी असून रुपये ३ हजार प्रती किलोप्रमाणे चढ्या दराने विकले जाते.

सर्व गायी वळूद्वारे नैसर्गिक पद्धतीने फळवल्या जातात व त्यामुळे या जातीचे शारीरिक गुणधर्म टिकून आहेत. या गोवंशाचे नर हे मादीपेक्षा आकाराने मोठे असतात. मथुरा लभान बैल हे प्रामुख्याने शेती व ओढकामासाठी वापरले जातात. हे गोवंश सूर्योदयापूर्वी जंगलात चराईसाठी एकत्र कळपाने सोडली जातात व सूर्यास्तापूर्वी वापस आणली जातात. चारा व पाणी यांच्या अभावामुळे उन्हाळ्यामध्ये हे गोवंश स्थलांतरित करून जून महिन्यात परत आणली जातात, असे सांगितले.

# जवळा येथे संत शिरोमणी गोरोबाकाका यांची पुण्यतिथी साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** संत शिरोमणी गोरोबाकाका यांची ७०९ वी पुण्यतिथी लोहा तालुक्यातील जवळा (दे.) येथील हनुमान मंदिर परिसरात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सोनखेडचे उपसरपंच सुनील मोरे, संतुकराव कानगुले, शिवसेना तालुका प्रमुख अशोक मोरे, प्रमुख मार्गदर्शक विश्वनाथन कोलमकर, म ुखेड नगरसेवक प्रतिनिधी जयप्रकाश कानगुले, लोहा नगरसेवक सदाभाऊ तेलंग, जवळा दे. येथील सरपंच इंदुताई पावडे, अजय पावडे, माजी सरपंच कमलताई शिखरे, माजी सरपंच ग्यानोबा टिमके, साहेबराव शिखरे, दिनाजी पावडे, सोपान बारसुळे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन मारोती चक्रधर यांनी केले होते.

यावेळी सुनील मोरे आणि अशोक मोरे तसेच विश्वनाथ कोलम कर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी धोंडीबा शिखरे, व्यंकटराव मोरे, राहुल गवळी, प्रल्हाद मोरे, अंकुश शिखरे पाटील, पंडित शिखरे, भानुदास शिखरे, नामदेव शिखरे, पांडुरंग शिखरे, शिवाजी शिखरे, ओम शेवडीकर, संगम शेवडीकर, शिवाजी कवडे, बबन पांचाळ, आनंदा दगडगावकर, विठ्ठल गवळी, व्यंकटराव गोड, उमाकांत बेंबडे, यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन संतोष घटकार यांनी केले तर आभार गंगाधर ढवळे यांनी मानले.

# आदिलाबाद-माहूर-वाशिम-पोहरादेवी रेल्वे मार्गास मंजुरी मिळवून द्या

## पालकमंत्री अतुल सावे यांना नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचे निवेदन

**माहूर (प्रतिनिधी)–** आदिलाबाद-माहूर-वाशिम-पोहरादेवी या रेल्वे मार्गास त्वरित मंजुरी द्यावी, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, माहूर हे रेणुका माता व श्री दत्तप्रभूंचे पवित्र तीर्थक्षेत्र असून येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. तसेच विदर्भातील बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेले पोहरादेवी, त्यांच्या जोडीला उनकेश्वर येथील शरभंग ऋषींचा आश्रम व हेमाडपंथी मंदिरातील गरम पाण्याचे कुंड, तसेच वाशिम येथील बालाजी मंदिर ही प्रमुख धार्मिक स्थळे या प्रस्तावित रेल्वेमार्गाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे भाविकांच्या प्रवासासाठी मोठी सुविधा निर्माण होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गेल्या तब्बल २२ वर्षांपासून आदिलाबाद-माहूर-पुसद-वाशिम हा रेल्वे मार्ग प्रलंबित असून, या परिसरातील आदिवासी, बंजारा तसेच इतर समाजघटकातील नागरिकांना अद्याप रेल्वे सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. परिणामी या भागाच्या सर्वांगीण विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. दरम्यान सन २०२४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकारतर्फे या प्रकल्पासाठी ५० टक्के आर्थिक सहभाग देण्याची घोषणा करण्यात आली होती. तसेच २०१३ च्या रेल्वे अर्थसंकल्पात या मार्गाच्या सर्वेक्षणासाठी तरतूद करण्यात आली होती. पुढे २०१६ मध्ये २२५ किमी लांबीच्या या रेल्वे मार्गाच्या अभियांत्रिकी व वाहतूक सर्वेक्षणास मंजुरी देऊन २६४५.८५ कोटी रुपयांचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आला आहे. मात्र, इतक्या सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही या प्रकल्पाला अद्याप प्रत्यक्ष गती मिळालेली नसल्याने स्थानिक नागरिक, भाविक व विविध समाजघटकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील लोकांसाठी योजना राबविल्या जात आहेत.

तसेच महाराष्ट्र शासनाने वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) व रामोशी समाजासाठी उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), गवळी समाजासाठी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), नाथपंथीय समाजासाठी श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), लोहार समाजासाठी ब्रम्हलीन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), विणकर समाजासाठी विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) या सहा उपकंपन्याची स्थापना केली आहे.

ही महामंडळे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. अंतर्गत कार्यरत असून, त्यांना स्वतंत्र उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. या सहा उपकंपनींना महामंडळा अंतर्गत विविध योजना राबलिल्या जातात. या योजनांचा लाभार्थ्यांनी लाभ घेऊन आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तुटलेले संसार अर्धापुरातील महिला समुपदेशन केंद्राने जोडले; १७७८ प्रकरणांत यशस्वी समेट

**अर्धापूर (प्रतिनिधी)**–येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला समुपदेशक स्मिता तरटे व गजानन चिंचोलकर यांनी गेल्या दीड दशकांत कुटुंबसंस्थेला भक्कम आधार देत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. सन २०१२ पासून ते मार्च २०२६ पर्यंत केंद्रात नोंद झालेल्या एकूण २१४९ प्रकरणांपैकी तब्बल १७७८ प्रकरणांमध्ये यशस्वी समेट घडवून पती-पत्नींचे संसार पुन्हा सुरळीत करण्यात केंद्राने मोलाची भूमिका बजावली आहे.

समुपदेशक स्मिता तरटे व गजानन चिंचोलकर यांच्या संयमी, संवेदनशील आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अनेक संसार तुटण्याच्या उंबरठ्यावर आलेल्या कुटुंबांना नवसंजीवनी मिळाली आहे. उर्वरित प्रकरणांपैकी काहींनी कायदेशीर फारकत घेतली, काहींना न्यायालयामार्फत पोटगी मंजूर झाली, तर सध्या २२ प्रकरणांवर समुपदेशन प्रक्रिया सुरू असल्याची माहिती तरटे यांनी दिली आहे.

या केंद्रात नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील महिलांना अर्ज करता येतो. येथे येणारी प्रकरणे विविध प्रकारची असतात, व्यसनाधीनता, विवाहबाह्य संबंध, परस्पर संशय, हुंड्याचे प्रश्न, आर्थिक वाद, स्वभावातील विसंगती आदी कारणांमुळे निर्माण झालेल्या कौटुंबिक तणावाचे स्वरूप गंभीर असते. मात्र या सर्व प्रकरणांमध्ये केवळ तडजोड घडवून आणण्यावर भर न देता, परस्पर संवाद वाढवणे, समजूतदारपणा निर्माण करणे आणि विश्वास पुनर्स्थापित करणे यावर केंद्रित पद्धतीने समुपदेशन केले जाते.

**गुण्यागोविंदाने नांदताना पाहणे, हीच कमाई –स्मिता तरटे**

छोट्या-छोट्या कारणांमुळे पती-पत्नींत वाद निर्माण होतात; मात्र संवादाअभावी ते तीव्र होतात. अशा वेळी समुपदेशनातून त्यांना पुन्हा एकत्र आणून आनंदाने नांदताना पाहणे, यापेक्षा मोठे समाधान नाही, असे समुपदेशक स्मिता तरटे यांनी सांगितले.

सध्या प्रलंबित असलेल्या २२ प्रकरणांमध्येही सकारात्मक बदल घडवून आणण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अर्धापूरचे महिला समुपदेशन केंद्र हे केवळ वाद मिटवण्यापुरते मर्यादित न राहता तुटणाऱ्या नात्यांना सावरण्याचे आणि समाजात कुटुंबसंस्थेची वीण अधिक मजबूत करण्याचे कार्य करत आहे. या समर्पित सेवेमुळे केंद्राने अनेक कुटुंबांचे आयुष्य नव्याने उजळवले असून, समाजात सकारात्मकतेचा संदेश देत 'आशेचा किरण' म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याला सलाम करत, समाजातील विविध स्तरांतून समुपदेशक स्मिता तरटे व गजानन चिंचोलकर यांचे मनापासून अभिनंदन केले जात आहे.

समुपदेशन प्रक्रियेत प्रथम पती-पत्नी व दोन्ही कुटुंबांना एकत्र बोलावून प्राथमिक चर्चा करून समेट घडविला जातो.

# सप्तरंगी साहित्य मंडळाच्या राज्याध्यक्षपदी मारोती कदम



**नांदेड (प्रतिनिधी)** –सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली 'सप्तरंगी'ची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १२ एप्रिल रोजी संघर्ष भवन येथे पार पडली. या सभेत २०२६ ते २०२८ करिता नूतन राज्याध्यक्ष म्हणून उदयोन्मुख समीक्षक तथा स्तंभलेखक मारोती कदम यांच्या बिनविरोध निवडीचा प्रस्ताव कार्याध्यक्ष शंकरराव गच्चे यांनी मांडला तर अनुमोदन सहसचिव कैलास धुतराज यांनी दिले.

मावळते राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे यांनी नवनिर्वाचित राज्याध्यक्ष मारोती कदम यांच्याकडे पदभार सुपूर्द केला. या निवडीबद्दल संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, सुनील बेंद्रीकर, महिला राज्याध्यक्ष रुपाली वागरे-वैद्य, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, चंद्रकांत कदम यांनी अभिनंदन केले.

# वाढत्या भारनियमनाला रोखण्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवा –नगरसेवक योगेश मुंडे



**नांदेड (प्रतिनिधी)** –महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मध्ये मोठ्या प्रमाणात भारनियमनाचा फटका वीज ग्राहकांसह सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. या प्रभागात महापालिकेचा पाणीपुरवठा होत असताना अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे अनेक नगरांमधील नागरिकांना पाणी मिळत नाही. यासाठी या प्रभागातील भार नियमनावर नियंत्रण मिळविण्यासाठी महावितरण कंपनीने नवीन व उच्च दर्जाचे ट्रान्सफॉर्मर बसवावे, अशी मागणी नगरसेवक योगेश मुंडे यांनी अधीक्षक अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहराच्या तरोडा खुर्द भागातील प्रभाग क्रमांक १ मध्ये अनेक नगरांचा समावेश आहे. सध्या सूर्य आग ओकत असल्याने तापमानात प्रचंड उकाडा जाणवत आहे आणि त्यातच भारनियमनाचा फटका बसत असल्याने नागरिकांच्या जीवाची लाही लाही होत आहे. तसेच या परिसरात मोठ्या प्रमाणात रुग्णालय असल्याने तेथेही रुग्णांचे बेहाल होत आहेत. महानगरपालिकेतून करण्यात येणारा पाणीपुरवठा ज्या दिवशी आहे विशेष करून त्याच दिवशी वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. यासोबतच रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्याने स्ट्रीट दिवाबत्ती बंद होत आहेत. त्यामुळे गुन्ह्यांची संख्या या भागात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

# प्रभाग क्र.१९ मधील नागरी सुविधांसाठी सुलोचना काकडे यांचे महापालिकेला निवेदन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १९ (वसरणी-कौठा) परिसरातील विविध नागरी समस्यांबाबत नगरसेविका सुलोचना काकडे यांनी महापौर व आयुक्तांकडे निवेदने सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

जुना कौठा पोलीस चौकी ते रविनगर या रस्त्याला सन १९९७ म ध्ये महानगरपालिका महासभेने मंजुरी दिल्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग असे नामकरण करण्यात आले होते. रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामादरम्यान सदर नामफलक काढण्यात आल्याने तो ३१ मे रोजी होणाऱ्या अहिल्यादेवी होळकर जयंतीपूर्वी पूर्ववत बसविण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.जुना कौठा, नवीन कौठा, मित्र नगर साईबाबा मंदिर परिसर तसेच प्रभागातील सिडको, संभाजी चौक, भीमवाडी, असर्जन, धुमाळवाडी, जयप्रकाशनगर, वसरणी आदी भागांमध्ये अनेक वर्षांपूर्वी बसविण्यात आलेले पथदिवे बंद पडले असून, नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित भागांमध्ये सुमारे २०० नवीन एलईडी पथदिवे उपलब्ध करून तातडीने बसविण्याची मागणी मनपा आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

दरम्यान रविनगर, जुना कौठा, मुरमुरा गल्ली, कौठा मुख्य रस्ता, नृसिंह चौक व श्रीपादनगर परिसरात पाणीपुरवठा पाईपलाईनला गळती होऊन मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचा मुद्दाही निवेदनात मांडण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर गळती दुरुस्त करून रविनगर येथील २४७ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नळजोडण्या सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सद्गुरू साईनाथ महाराज यांच्या आश्रमातील माहुरगडावर अधिक मासानिमित्त महिनाभर अन्नदान व दत्त नामस्मरण सोहळा



**उमरी (प्रतिनिधी)** –उमरी तालुक्यातील संतांच्या भूमीत जन्मलेले सद्गुरू साईनाथ महाराज बितनाळकर उर्फ वसमतकर यांच्या श्रीक्षेत्र माहुर गडावरील आश्रमात अधिक मास (धोंड्याचा महिना) पुरुषोत्तम मासानिमित्त १७ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत अन्नदान व दत्त नामस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

गोरठा येथील संतदासगणू महाराज यांच्या गावी काही काळ सद्गुरू साईनाथ महाराज यांचे वडील वास्तव्यात होते. याच पावन भूमीत तालुक्यातील बितनाळ येथील साईनाथ महाराज हे दुसरे संत म्हणून उदयास आले आहेत. त्यांच्या विविध सामाजिक उपक्रमाची दखल घेऊन शासनाने त्यांची महाराष्ट्राचे स्वच्छता दूत ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड केली आहे. शासकीय आयटीआय प्रमुख मार्गदर्शक साईनाथ महाराज वसमतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा आध्यात्मिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम पार पडणार आहे.

साईनाथ महाराज वसमतकर हे समाजप्रबोधन, स्वच्छता, अन्नदान व अध्यात्म क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या दशसूत्री कार्यक्रमातून राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये नित्य अन्नदान, शिवनेरी किल्ल्यावर दत्त नामस्मरण, अटारी बॉर्डर येथे दत्त नामाचा गजर, तसेच गिरनार पर्वतावर सात दिवसांचा सप्ताह व नामस्मरण यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, बुवाबाजीविरोधी जनजागृती, शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रातही ते सातत्याने कार्यरत आहेत.

या उपक्रमासाठी माहूर तालुक्यातील भाविक, नागरिकांना चुलबंद आमंत्रण देण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्याची सुरुवात १७ मे रोजी अन्नदानाच्या पहिल्या पंगतीने होणार असून, ही सेवा उमरी तालुक्यातील सुभाष देशमुख गोरठेकर सभापती शिरीष देशमुख गोरठेकर, उमरीचे उपनराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर व समस्त गोरठेकर परिवार आणि गावकरी मंडळीच्या वतीने करण्यात येणार आहे.

अखंड अन्नदान महायज्ञाचा समारोप १५ जून रोजी साईनाथ महाराज वसमतकर यांचे जन्मगाव बितनाळ येथील भाविकांच्या वतीने करण्यात येणार आहे. या कालावधीत दररोज दत्त नामस्मरण, भजन, कीर्तन, प्रवचन, अन्नदान तसेच समाजप्रबोधनपर विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

या पार्श्वभूमीवर साईनाथ महाराज वसमतकर यांच्या दशसूत्री कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. सामाजिक, आध्यात्मिक व जनजागृतीसंदर्भातील विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तेव्हा भाविक-भक्तांनी या पवित्र सोहळ्यास आनंद दत्तधाम आश्रम श्रीक्षेत्र माहुरगड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पशुपालकांसाठी सुवर्णसंधी : 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' अंतर्गत ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध करून दिले जाईल. दूध संस्थेने हमी दिल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडीट कार्ड आहे, त्यांनाही ३ लाखांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेता येईल.

कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३ टक्के आणि राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्केपर्यंत व्याज सवलत मिळू शकते. बँकांनाही यात २ टक्के व्याज सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालक/ शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत शून्य टक्के व्याजदराचाही लाभ घेता येऊ शकतो. सन २०२६-२७ पासून 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' (राज्य व जिल्हास्तर) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ घेता येईल. राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात अथवा १९६२ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रगतीमंत्र

## बिझनेस न्यूज

# एसी, टीव्ही, रेफ्रिजरेटर, स्मार्टफोन... सर्व काही महाग होणार!

## कंपन्या चार महिन्यांत तिसऱ्यांदा दरवाढ करणार

**जर तुम्ही या उन्हाळ्यात नवीन एसी, रेफ्रिजरेटर किंवा स्मार्टफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर तुम्हाला जास्त पैसे मोजावे लागू शकतात. एअर कंडिशनर (एसी), रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, टीव्ही, स्मार्टफोन आणि लॅपटॉप यांसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किमती एप्रिल अखेरपर्यंत पुन्हा वाढू शकतात. गेल्या चार महिन्यांतील ही तिसरी दरवाढ असेल. उद्योग तज्ज्ञांच्या मते, कच्च्या तेलाशी संबंधित कच्चा माल, मेमरी चिप्सच्या वाढलेल्या किमती आणि रुपयाच्या घसरणीमुळे कंपन्यांचा खर्च सातत्याने वाढत आहे. कंपन्या ही दरवाढ ग्राहकांवर लादण्याची तयारी करत आहेत.**




### किमती किती वाढू शकतात?

» किरकोळ विक्रेते आणि उत्पादकांच्या अंदाजानुसार, विविध श्रेणींमध्ये खालीलप्रमाणे दरवाढ दिसून येऊ शकते:
» स्मार्टफोन: १०% ते १५% नी महाग होऊ शकतात.
» लॅपटॉप: ८% ते १०% नी महाग होऊ शकतात.
» एसी, टीव्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन: ५% ते ७% नी महाग होऊ शकतात.

### दरवाढ कधी सुरू होईल?

हायर इंडियाने संकेत दिले आहेत की २१ एप्रिलपासून सर्व उत्पादन श्रेणींमध्ये किमती ४% ते ७% ने वाढवल्या जातील. साबण आणि डिटर्जंट उत्पादकही किमती वाढवत आहेत. काही जण किमती वाढवण्याऐवजी पॅकेजचा आकार कमी करत आहेत.



### किंमतवाढीची 4 मुख्य कारणे

1 कच्च्या मालाच्या किमती : प्लास्टिकसारखा कच्चा माल, जो कच्च्या तेलापासून बनतो. त्याच्या किमती खूप जास्त झाल्या आहेत. साबण आणि डिटर्जंटमध्ये वापरले जाणारे पाम तेल आणि इतर रसायनांच्या किमतीही वाढल्या आहेत.

2 मेमरी चिप्सचा तुटवडा : स्मार्टफोन आणि लॅपटॉपमध्ये वापरल्या जाणाऱ्या मेमरी चिप्सचा तुटवडा आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) ॲप्सची वाढती मागणी यामुळे चिप्सच्या किमती गगनाला भिडत आहेत.

3 रुपयाचे अवमूल्यन : अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया लक्षणीयरीत्या कमकुवत झाला आहे. यामुळे आयात केलेले घटक अधिक महाग झाले आहेत.

4 लॉजिस्टिक्स आणि मालवाहतूक : भू-राजकीय तणावामुळे मालवाहतुकीचा खर्च वाढला आहे, ज्यामुळे पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे.

## बँक लोनसाठी कुणाचे गॅरंटर बनत असाल तर थांबा...

**सिबिल स्कोअर कमी होईल... :** जेव्हा कर्ज खात्याची परतफेड होत नाही, तेव्हा बँक सर्वप्रथम सिबिलला कळवते. दिलेल्या माहितीत कर्जदाराच्या पॅन क्रमांकासोबत जामीनदाराच्या पॅन क्रमांकाचाही समावेश असतो. याचा अर्थ असा की, जर कर्ज खात्याची परतफेड झाली नाही, तर जामीनदाराच्या क्रेडिट स्कोअरवरही परिणाम होतो. परिणामी, जामीनदाराला त्या बँकेकडून किंवा इतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळू शकणार नाही.

**तुमच्याकडूनही वसुली होऊ शकते... :** जेव्हा बँकेच्या कर्ज खात्याची परतफेड होत नाही, तेव्हा बँक सर्वप्रथम मूळ कर्जदाराची मालमत्ता जप्त करून पैसे वसूल करण्याचा प्रयत्न करते. जर हे शक्य नसेल, तर बँकेला जामीनदाराची मालमत्ता जप्त करण्याचा किंवा त्याच्याकडून रक्कम आणि व्याज वसूल करण्याचा अधिकार आहे. कागदोपत्री जामीनदार आधीच थकबाकीदार म्हणून घोषित केला जातो.

**बँक कायदेशीररित्या हक्कदार :** जेव्हा एखादी व्यक्ती कर्ज खात्यासाठी जामीनदार बनते, तेव्हा ती कर्ज अर्जावर सही देखील करते. त्याच वेळी, बँक आणि जामीनदार यांच्यात एक करार केला जातो, ज्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले असते की जर कर्जदार थकबाकीची रक्कम भरण्यात अयशस्वी झाला, तर जामीनदाराने व्याजासह थकबाकीची रक्कम परत करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत बँकेला जामीनदाराकडून कर्ज वसूल करण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

---

बादलीत लघुशंका करून माझ्यावर फेकली... माझ्या शरीरावर भाजल्याच्या अन् कापल्याच्या खुणा...

# वाईटातल्या वाईट परिस्थितीतून सविता प्रधान बनली कमिश्नर!



**'मी मरायला निघाले होते. मी माझ्या मुलाला झोपवले. त्याच्या कपाळाचे शेवटचे चुंबन घेतले आणि मग स्वतःला फाशी देण्यासाठी एका स्टूलवर चढले. मी माझी साडी पंख्याला लटकवून गळ्यात घातली...' पीसीएस अधिकारी सविता प्रधान यांची कहाणी अंगावर काटा आणणारी आहे. सासरी भोगत असलेल्या नरकयातनेपेक्षा मृत्यू बरा, असे त्यांना वाटले. पण त्या दोन- तीन सेकंदांत त्यांनी केवळ स्वतःला सावरलेच नाही, तर एक नवीन आयुष्य आणि मार्गही घडवला. सिंगरौली महानगरपालिकेच्या आयुक्त सविता प्रधान यांची यशोगाथा आपल्याला संकटांविरुद्ध लढायला शिकवते...**



### आदिवासी कुटुंबात जन्म, शिक्षणासाठी संघर्ष

सविता प्रधान यांचा जन्म मध्य प्रदेशातील एका छोट्याशा गावात आदिवासी कुटुंबात झाला. सविता यांचा संघर्ष लहानपणापासूनच सुरू झाला. लहान गाव, मागासलेला परिसर आणि सुविधांचा अभाव यामुळे कुटुंबातील सदस्य भात कापणी, महुआची फुले वेचणे, शेण गोळा करणे आणि बिडीची पाने तोडणे यांसारखी कामे करत असत. त्याही ही सर्व कामे करत असत. गावातील बहुतेक लोक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नसत. पण त्यांच्या आई- वडिलांनी त्यांना शिकवण्याचा निर्णय घेतला. त्या त्यांच्या गावातील दहावी उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या मुलगी होत्या.

### शाळेपर्यंत 7 किलोमीटर चालत जायच्या...

सविता प्रधान यांनी शाळेच्या दिवसांची आठवण सांगितली. त्या म्हणाल्या, की दहावीनंतर माझ्या वडिलांनी शासकीय कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्याची परवानगी दिली. हे महाविद्यालय गावापासून सुमारे ७ किलोमीटर अंतरावर होते. गाव आणि शाळा यांच्या दरम्यान फक्त एकच बस धावत असे, आणि ती बससुद्धा कधी यायची तर कधी नाही. बसचे भाडे येण्या-जाण्यासाठी दोन रुपये होते. सविता सांगतात, की त्यावेळी आमची आर्थिक परिस्थिती अशी नव्हती की आम्ही रोज दोन रुपयेसुद्धा खर्च करू शकू. त्यामुळे आम्ही अनेकदा शाळेत चालत जायचो. मग, माझ्या आईने त्याच गावात एक छोटी नोकरी पत्करली, ज्यामुळे आम्हाला तिथेच राहणे शक्य झाले आणि शिक्षण घेणे थोडे सोपे झाले.

### डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहिले होते...

सविता सांगतात, की गावातील दहावी उत्तीर्ण होणारी मी पहिली मुलगी होती. त्याच आनंदात आणि आत्मविश्वासाने डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहिले. परिसरातील अनेक मुले पीएमटी परीक्षेच्या तयारीसाठी अकरावीत जीवशास्त्र शिकत असल्यामुळे मीही अकरावीत जीवशास्त्र शिकायला सुरुवात केली. शिक्षण सुरू असतानाच एका खूप श्रीमंत कुटुंबाकडून लग्नाचा प्रस्ताव आला आणि हा तिच्या आयुष्यातील सर्वात वेदनादायक टप्पा ठरला. सविता सांगतात, की त्यावेळी माझ्या वडिलांनी कोणताही विचार न करता माझे लग्न ठरवले. कारण एका आदिवासी कुटुंबासाठी इतक्या प्रतिष्ठित कुटुंबाकडून लग्नाचा प्रस्ताव येणे ही काही साधी गोष्ट नव्हती. लग्नानंतर डॉक्टर होणे सोपे जाईल, असा विचार करून त्यांनी हा निर्णय घेतला होता. मुलगा माझ्यापेक्षा १० वर्षांनी मोठा होता. तो तिचे शिक्षण पूर्ण करेल, असे सासरच्यांकडून आश्वासन मिळाल्यानंतर साखरपुडा झाला होता. पण लवकरच, ते आश्वासन खोटे ठरले.

### लहान वयात लग्न, मुले, कौटुंबिक हिंसाचार...

सविता प्रधान यांचे लग्न अवघ्या १६ व्या वर्षी झाले. त्यांचे वैवाहिक जीवन खूप कठीण होते. नवऱ्याकडून सातत्याने शिवीगाळ, धमक्या, मारहाण आणि सार्वजनिक ठिकाणी होणारा अपमान या गोष्टी नित्याच्या झाल्या होत्या. सासरच्या घरी व्यवस्थित जेवण मिळणेही कठीण झाले होते. घर साफ केल्यावर स्वयंपाक करायला सांगितले जायचे. नोकरासारखी वागणूक दिली जात होती. त्या सांगतात, की मी अनेकदा भाकरी अंतर्वस्त्रात लपवून फक्त खाण्यासाठीच बाथरूममध्ये जायचे. तेव्हाही माझ्यासोबत काय घडत आहे हे माझ्या लक्षात आले नाही. त्या सांगतात, की छळ वाढतच गेला. मला छोट्या छोट्या गोष्टींसाठी मारहाण केली जायची. माझ्यावर रात्रंदिवस शारीरिक अत्याचार होत होते. एके दिवशी, जेव्हा माझे वडील भेटायला आले, तेव्हा मी त्यांना सोबत घेऊन जाण्याची विनंती केली. त्यांनी संध्याकाळपर्यंत तुला घरी घेऊन जातो, असे वचन दिले. पण ते कधीच आले नाहीत. त्या दिवशी मला जाणवले की या नरकातून मला वाचवायला कोणीही येणार नाही...

### मी स्वत :ला फाशी देणार होते...

सविता दोन मुलांच्या आई झाल्या, पण त्यांच्या परिस्थितीत फारशी सुधारणा झाली नव्हती. त्या म्हणतात, की माझ्या कपाळावर जखमा आहेत, हातांवर ओरखडे आहेत आणि पाठ भाजली आहे. रोजचा छळ असह्य झाला होता. मला माहीत होतं की आत्महत्या करणं चुकीचं आहे, पण मला दुसरा कोणताही मार्ग दिसत नव्हता. एके दिवशी, मी आत्महत्या करायचं ठरवलं. मी माझ्या मुलाला झोपवलं. दुसऱ्या मुलाला जेवण भरवलं. त्यांच्या कपाळाचं चुंबन घेतलं. नंतर एक स्टूल ओढला आणि माझी साडी पंख्यावर टांगली. मी गळफास घेणारच होते, तेवढ्यात मला खिडकीतून माझ्या सासूचा चेहरा दिसला. तिने मला पाहिलं, पण तिने मला थांबवलं नाही; तिच्या चेहऱ्यावर कोणताही भाव नव्हता. जणू काही तिने काही पाहिलंच नाही किंवा तिला त्याची पर्वाच नव्हती, अशा आविर्भावात ती निघून गेली. हा माझ्यासाठी एक निर्णायक क्षण होता. तेव्हा मला जाणवलं की मी अशा लोकांसाठी माझा जीव देऊ शकत नाही. हिम्मत गोळा करून मी सासरच्या घरातून पळ काढला...



सविता प्रधान यांचा आई-वडील आणि भावासोबतचा जुना फोटो.

### बादलीत लघवी करून माझ्यावर फेकली...



सासरच्या घरातून पळून आल्यानंतर, सविता त्यांच्या चुलत बहिणीच्या वहिनीच्या घरी राहू लागली. त्यांनी पार्लरमध्ये काम केले, शिकवणी लावली आणि पुढील शिक्षण घेण्यासाठी संघर्ष केला. पण सर्व काही संपले नव्हते. विभक्त झाल्यानंतरही त्यांचा नवरा अधूनमधून भेटायला यायचा आणि त्यांना मारहाण करायचा. त्यांनी सांगितले, की तो मला मुलांसमोर मारायचा. एके दिवशी त्याने बादलीत लघवी करून माझ्यावर फेकली. मी परीक्षेला जात होते. मी पुन्हा अंघोळ केली, कपडे बदलले आणि माझा पेपर द्यायला गेले. माझे मन खरोखरच कठोर झाले होते.

### पहिल्याच प्रयत्नात अधिकारी पद मिळवले...

एक चांगली सरकारी नोकरी मिळवणे हे सविता यांचे ध्येय होते. त्यांनी एकटीने मुलांचे संगोपन करत नागरी सेवा परीक्षेची तयारी केली आणि लवकरच त्यांच्या मेहनतीचे फळ मिळाले. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर आणि कष्टानंतर, सविता पहिल्याच प्रयत्नात मध्य प्रदेश राज्य नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्या एक सरकारी अधिकारी बनल्या. एक आदिवासी विद्यार्थिनी म्हणून मिळवलेल्या या यशाबद्दल, सरकारने त्यांना ७५ हजार रुपयांची शिष्यवृत्तीही दिली. सविता प्रधान या मध्य प्रदेशातील सिंगरौलीच्या नगर आयुक्त बनल्या. त्या आपल्या पदाचा उपयोग इतरांना, विशेषतः गरीब समाजातील महिला आणि मुलींना मदत करण्यासाठी करतात. त्या त्यांच्या शिक्षणाच्या आणि निर्भय जीवनाच्या हक्कासाठी लढतात.

---

# तीन वेळा अपयशी ठरूनही सुधाने मानली नाही हार!; 2 हजारांत व्यवसाय सुरू करून, आज उलाढाल लाखोंची!!

**असे म्हटले जाते की, जर एखाद्या व्यक्तीमध्ये काहीतरी साध्य करण्याचा दृढनिश्चय आणि प्रबळ इच्छाशक्ती असेल, तर गरिबी आणि अपयशाच्या बेड्याही त्याला रोखू शकत नाहीत. तामिळनाडूच्या नमक्कल जिल्ह्यातील रहिवासी सुधाची कहाणी याचेच एक जिवंत उदाहरण आहे. केवळ २ हजार रुपयांच्या अल्प भांडवलाने आपला स्टार्टअप सुरू करून व्ही. पी. सुधा आज लाखो रुपये कमावणारी एक यशस्वी उद्योजिका बनली आहे.**

सुधा यांचे बालपण अत्यंत गरीबीत गेले. बिकट परिस्थितीमुळे तिला आणि तिच्या बहिणीला आजी-आजोबांकडे राहायला पाठवण्यात आले. अभ्यासात सुरुवातीच्या मार्गदर्शनाअभावी सुधा पाचवीत नापास झाली. दुसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यानंतर सहावीतही ती नापास झाली. पुन्हा दुसऱ्या प्रयत्नात यश आणि मग सातवीतही नापास... तिची भावंडे हार मानून शिक्षण सोडून देत असताना, सुधाने आपल्या आईकडून प्रेरणा घेऊन चिकाटी सोडली नाही. तिने शाळा बदलली, कठोर परिश्रम घेतले आणि केवळ दहावी उत्तीर्णच झाली नाही, तर बी.एस्सी. पदवी मिळवून ती आपल्या कुटुंबातील पहिली पदवीधर ठरली आणि त्यानंतर तिने एम.एस्सी. पदवीही मिळवली.



» व्यवसायाची कल्पना कशी सुचली : सुधाचा व्यवसाय एका आईच्या आपल्या मुलीबद्दलच्या काळजीतून सुरू झाला. २०११ मध्ये कोईम्बतूरला आल्यानंतर, तिची ४ वर्षांची मुलगी खाण्यापिण्याच्या बाबतीत खूप चोखंदळ होती. आपल्या मुलीला संपूर्ण पोषण मिळावे, याची सुधाला खात्री करायची होती. सुधाने शेवगा, पुदिना आणि कढीपत्ता वाळवून त्याची पूड केली आणि इडली व डोशात मिसळून आपल्या मुलीला खायला देऊ लागली. तिच्या मुलीला ती चव खूप आवडली. तेव्हा सुधाच्या लक्षात आले की ही समस्या प्रत्येक आईला भेडसावते आणि तिच्याकडे एक उत्तम उत्पादन आहे.

» आज लाखो रुपयांची कमाई : आपल्या व्यवसायाला व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी, सुधाने तामिळनाडू कृषी विद्यापीठातून (TNAU) प्रशिक्षण घेतले. तिने २ लाख रुपयांचे कर्ज घेऊन एक सोलर ड्रायर आणि इतर यंत्रसामग्री खरेदी केली आणि एक उत्पादन युनिट उभारले. सुधाचे यश पाहून तिचा नवरा कुमार यानेही नोकरी सोडून व्यवसायात प्रवेश केला. आज, ती कोईम्बतूरमध्ये स्वतःचे दुकान चालवते आणि ५०० हून अधिक कुटुंबांना आपले मसाले आणि पावडर पुरवते. २०२४ च्या एका अहवालानुसार, ती दरमहा १२० किलोपेक्षा जास्त उत्पादने विकते आणि तिची सूप पावडर हे तिचे सर्वाधिक विकले जाणारे उत्पादन आहे. ती तिच्या व्यवसायातून लाखो रुपये कमावत आहे.




२०१६ मध्ये नोकरीच्या पगारातून वाचवलेल्या २,००० रुपयांमधून सुधाने घरबसल्या पावडर बनवून विकायला सुरुवात केली. २०१८ मध्ये तिने 'इनिया ऑरगॅनिक्स' या नावाने आपल्या कंपनीची नोंदणी केली. ती स्थानिक शेतकऱ्यांकडून ताजा पालक, शेवग्याची पाने, पुदिना आणि कोथिंबीर खरेदी करत असे. ती ते उन्हात वाळवून, आपल्या खास रेसिपीनुसार दळून विकत असे. अल्पावधीत तिच्या उत्पादनाला मागणी वाढली आणि व्यवसाय वाढत गेला.

# सहा महिन्यांत तब्बल ३४ आदिवासी मुली बेपत्ता

**यवतमाळ (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यात सहा महिन्यात तब्बल ३४ आदिवासी मुली गायब झाल्याचे पुढे आले आहे. त्यात त्यांची मानवी तस्करी केली जात असल्याची धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यात एक मुलगी आणि तिचा प्रियकर यांच्यातील संभाषणाची कथित 'ऑडिओ क्लिप'समोर आली आहे. त्यात कशा पध्दतीने मानवी तस्करीकेली जाते, हे सांगितलं जातं आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी हा राळेगावमधील मजहर कुरेशी असल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, यवतमाळच्या राळेगावमध्ये आदिवासी मुलींची तस्करी होत असल्याचा गंभीर आरोप भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांनी केला आहे. अल्पवयीन मुलींना परराज्यात विकले जात असल्याचा गंभीर आरोप करत देह व्यापार, मानवी तस्करी यांसारखे गंभीर प्रकार सुरू असल्याचा अतिशय धक्कादायक दावा प्रफुल चव्हाण यांनी केला आहे. अशातच, चव्हाण यांच्या आरोपांची आदिवासी विकास मंत्र्यांकडून दखल घेण्यात आली असून मंत्री डॉ. अशोक उईकेंनी या प्रकरणी अप्पर पोलीस अधीक्षकांची भेट घेतलीय.

मंत्री डॉ. अशोक उईके यांनी पोलीस अधीक्षक अशोक थोरातांना या प्रकरणी तपासाच्या सूचना दिल्या आहेत. मात्र आदिवासी मंत्र्यांच्या तक्रारीनंतरही अजून या प्रकरणी गुन्हा दाखल न झाल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. मंत्री अशोक उईकेंची उपविभागीय अधिकारी बन्सल यांच्याशीही या प्रकरणी चर्चा झाली असून या प्रकरणात जातीने लक्ष घाला, वेगानं तपास करा, अशा उपविभागीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहे. त्यामुळे या प्रकरणात आता नेमकी काय कारवाई केली जाते, आणि तपासाअंती नेमकी काय माहिती समोर येतं हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, या प्रकरणातील संशयित आरोपीला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. मात्र पोलिसांनी त्याला सोडून दिले आहे. त्यांनतर तो तेलंगणामध्ये पळून जात असताना त्याला पुन्हा पकडले गेले. यात पोलिसांनी आरोपीला मदत करणाऱ्या पोलिसांना तपासापासून दूर ठेवावे, तसेच त्याच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली होती. यात आदिवासी मुलींना त्याच्या पालकांना पैश्याचे आमिष देऊन अश्या पध्दतीने फूस लावली जात आहे. ही गंभीर बाब आहे. आम्ही गृह विभागकडे याबाबत माहीती दिली आहे.

# २०२७ च्या वर्ल्डकप निवड समिती अध्यक्षपदी अजित आगरकर

**मुंबई (प्रतिनिधी)** – बीसीसीआयने अजित आगरकरचा टीम इंडियाच्या वरिष्ठ संघाचे मुख्य निवडकर्तेपदाचा करार आणखी एका वर्षासाठी नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आगरकर २०२७ पर्यंत निवड समितीचे अध्यक्ष म्हणून कायम राहील. आगरकरच्या अध्यक्षतेखाली ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२६ दरम्यान भारतीय संघाने चार आयसीसी स्पर्धाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आणि त्यापैकी तीन स्पर्धा जिंकल्या. त्यात दोन टी२० विश्वचषक आणि एक आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचा समावेश होता. त्यामुळे त्याचा करार चौथ्या वर्षासाठी नूतनीकरण केला गेला आहे.



आगरकरने मुदतवाढीची मागणी केली नव्हती. पण एक निवडकर्ता कनिष्ठ किंवा वरिष्ठ निवड समितीत चार वर्षापर्यंत आणि दोन्ही समित्यांमध्ये मिळून एकूण पाच वर्षापर्यंत काम करू शकतो. त्यामुळे अजित आगस्करच्या कराराचे नूतनीकरण केले जात आहे. ही मुदतवाढ नाही तर नुतनीकरण आहे, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने पीटीआयला सांगितले.

अजित आगरकरच्या जवळच्या सूत्रांनी सांगितले आहे की, आगरकरने स्वतः नूतनीकरणाची मागणी करण्याऐवजी निर्णय घेणाऱ्यांना आपल्या समितीच्या कामगिरीचे मूल्यांकन करू देणे पसंत केले. ५० षटकांच्या विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर संघात सातत्य राखणे, हा मंडळाच्या निर्णयामागील एक महत्त्वाचा घटक आहे. तसेच त्याच्या कार्यकाळात, समितीने अनेक कठोर निर्णय घेतले, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या कसोटी निवृत्तीवर देखरेख ठेवणे, वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून हळूहळू बाहेर काढणे यांचा यात समावेश आहे. या निर्णयांवर टीका झाली. पण काही निर्णयांची मात्र वाहवा करण्यात आली.

या समितीने काही धाडसी निर्णयही घेतले. कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिलला टी२० विश्वचषक संघातून वगळून त्याच्या जागी फॉर्मात असलेल्या इशान किशनला संधी देण्यात आली. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा या जोडीला सातत्याने संधी देत राहिले. रोहित शर्मानंतर सूर्यकुमार यादवला टी२० संघाचे कर्णधारपद देण्यावर अजित आगरकर ठाम राहिला. अशा काही चौकटीबाहेरच्या पण संघाला फायदा होणाऱ्या निर्णयामुळे आगरकरला आणखी एक वर्ष त्याच्या पदावर कायम राहता येणार आहे.

# बेपत्ता भावांपैकी एकाचा मृतदेह सापडला; दुसऱ्याचा शोध सुरू

**लातूर (प्रतिनिधी)** – लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यात दोन सख्खे चुलत भाऊ घरातून बेपत्ता झाल्याच्या घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून, यातील ६ वर्षीय चिमुकल्याचा मृतदेह घराच्या अवघ्या ६० फुटांवर आढळल्याने खळबळ उडाली आहे. रविवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास स्वामी कुटुंबातील देवांश (६ वर्षे) आणि साईचरण (११ वर्षे) हे दोघेही बेपत्ता झाले होते, ज्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल केली.

शोधमोहीम सुरू असतानाच देवांशचा मृतदेह संशयास्पद स्थितीत सापडला, मात्र ११ वर्षांचा साईचरण अद्यापही बेपत्ता असून पोलिस त्याचा युद्धपातळीवर शोध घेत आहेत. या हृदयद्रावक घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात भीतीचे आणि शोकाकुल वातावरण पसरले आहे. ११ वर्षीय साईचरण दिनेश स्वामी हा अद्याप बेपत्ता असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. ही मुले बेपत्ता होण्यामागचे नेमके कारण काय आणि ६ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू हा घातपात आहे की अपघात, याबाबत अद्याप अनेक प्रश्न अनुत्तरित असून पोलिस तपासातूनच यावर प्रकाश पडणार आहे. दरम्यान, मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चाकूर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला असून, या धक्कादायक घटनेची माहिती मिळताच रुग्णालय परिसरात नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन लातूर जिल्ह्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह फॉरेन्सिक टीम, फिंगरप्रिंट टीम, श्वान पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली आहेत. चिमुकल्याच्या संशयास्पद मृत्यूचा छडा लावण्यासाठी आणि बेपत्ता असलेल्या दुसऱ्या मुलाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र तपास पथके तयार केली असून, या घटनेमागील गूढ उकलण्यासाठी सर्व यंत्रणांच्या माध्यमातून युद्धपातळीवर तपास सुरू करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले की, घटनेचे गांभीर्य लक्षात घेताच अतिरिक्त पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेसह लातूर आणि अहमदपूर येथील पोलिसांची पथके चाकूर येथे दाखल झाली आहेत. जवळपास दहा पथके तयार करण्यात आली असून आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. त्याचबरोबर बेपत्ता असलेल्या मुलाबाबत माहिती गोळा करून त्याचा शोध घेण्यावर विशेष भर दिला जात आहे.

# भोंदू राजेंद्र गडगेचा दत्तधाम दरबार 'सील'

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील तथाकथित 'दत्तधाम दरबार' चालवणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे याच्याविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गडगेच्या दरबारावर पोलिसांनी छापा टाकत संपूर्ण परिसर सिल केला असून तब्बल चार तास झाडाझडती घेण्यात आली. या कारवाई दरम्यान दरबारात स्पॉट पंचनामा करण्यात आला. तसेच विविध औषधांचे नमुनेही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नागरिकांची फसवणूक आणि अंधश्रद्धा पसरवल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या राजेंद्र गडगेला न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून गडगेच्या कथित दरबारामागील संपूर्ण जाळं उघड करण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अंधश्रद्धेच्या नावाखाली भोंदूगिरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



अहिल्यानगरमधील संगमनेरच्या भोंदू बाबाचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. पोटाचा आजार दूर करण्याच्या आणि लग्न जमवून देण्याच्या नावाखाली या भोंदूनं बीडमधील तरुणाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी भोंदूनं तब्बल २२ हजार रुपये उकळल्याची माहिती तरुणाने दिली. याबाबत तरुणाने भोंदू बाबाबाबत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे.

वडगावपान इथं मंत्रोच्चाराने दुर्धर आजार बरे करण्याचा दावा करणाऱ्या भोंदूला गजाआड करण्यात आलं आहे. दत्तधाम सरकार नावाने तो दरबार चालवत होता. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या भोंदूविरोधात गुन्हा दाखल केल्यानंतर संगमनेर पोलिसांनी राजेंद्र गडगेला अटक केली. आता त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. राजेंद्र गडगेच्या भोंदूगिरीचे अनेक कारनामे समोर आले आहेत. व्यवसायातील नुकसानासह, सांधेदुखी, मणक्याचा त्रास, कॅन्सरसारखे आजार मंत्राने बरे झाल्याचा दावा भोंदू राजेंद्र गडगे करायचा. त्याचे काही व्हिडीओ यूट्यूबवर अपलोड करायचा.

गेल्या १० वर्षांपासून राजेंद्र गडगे हा व्यवसाय करत होता. या काळात त्याने शेकडो कुटुंबांचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याची माहिती देखील समोर येत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) राज्य सचिव ड. रंजना गवांदे यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनंतर संगमनेर तालुका पोलिसांनी राजेंद्र गडगेला अटक केली. पोलिसांनी मुख्य आरोपी राजेंद्र गडगे याच्यासह मधुकर शिंदे, गडगेची मुलगी ज्ञानेश्वरी गडगे, डॉ. मोहन पुरी आणि सुरज शिंदे यांना अटक केली.

# मुलीच्या मैत्रिणीवर अत्याचार; पीडितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**भंडारा (प्रतिनिधी)** – भंडारा जिल्ह्यातील मोहदुरा गावातून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. आपल्या स्वतःच्या मुलीच्या अल्पवयीन मैत्रिणीवर एका नराधमाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रसंगामुळे हादरलेल्या पीडित मुलीने विषप्राशन करून जीवन संपवण्याचा प्रयत्न केला.

आरोपी सोमा मेश्राम (३६) याची मुलगी आणि पीडिता या एकाच वर्गात शिकतात. गुरुवारी पीडिता तिच्या मैत्रिणीच्या (आरोपीच्या) घरी थांबली असताना, सोमा मेश्रामने तिला दुचाकीवर फिरवून आणण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर तिला एका निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर अत्याचार केला. शुक्रवारी सकाळी पीडितेने घरच्यांना हा आपबिती सांगितली.

या घटनेच्या मानसिक धक्क्यातून पीडितेने विषप्राशन केले. तिला तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या तिची प्रकृती स्थिर आहे. भंडारा पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपी सोमा मेश्राम याला तातडीने अटक केली आहे. त्याच्यावर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

पंचवटी परिसरात आणखी एक लव्ह जिहादचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अभियंता तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तीचे लैंगिक शोषण केलेच पण तिची धार्मिक ओळख पुसून टाकण्याचाही प्रयत्न केला. पंचवटी पोलिसांनी संशयित तांजिर इनामदार याला अटक केली. शनिवारी (दि.१९) त्याला न्यायालयात हजर केले असता २२ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. याबाबत पीडित तरुणीने तक्रार दिली.

# 'समृद्धी'वरील भीषण अपघातात दीड वर्षांच्या बालकाचा मृत्यू

## रिल्स बनविण्याच्या नादात बसचालकाची बेपर्वाई

**बुलढाणा (प्रतिनिधी)** – नेहमीच अपघातांच्या सत्रामुळे चर्चेत असणाऱ्या समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघात घडला आहे. खासगी बस चालक आणि क्लिनरच्या रिल्स बनवण्याच्या वेडापायी हा अपघात झाला आहे. या अपघातामध्ये एका दीड वर्षाच्या निष्पाप बालकाला आपला जीव नाहक गमवावा लागला आहे. तर, २० ते २५ जण जखमी झाल्याचे समोर आले आहे.



मेहकर येथील टोलनाक्याजवळ एका खाजगी लक्झरी बसचा हा अपघात झाला. ही बस वेगात असताना चालक आणि क्लिनर मोबाईलवर रिल्स बनवण्यात गुंग होते. या नादात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस अनियंत्रित होऊन महामार्गावरच पलटी झाली. ही बस एवढ्या जोरात पलटी झाली की ती बाजूने जाणाऱ्या एका चारचाकी वाहनावर जाऊन आदळली. यामध्ये चारचाकी वाहनाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अपघातानंतर घटनास्थळी प्रवाशांचा प्रचंड आक्रोश ऐकायला मिळत होता. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत जखमींना बाहेर काढले. मात्र, दुर्दैवाने या अपघातात एका दीड वर्षाच्या मुलाचा जागीच मृत्यू झाला. जखमींना तातडीने उपचारासाठी मेहकरच्या ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, परंतु तिथे एकही डॉक्टर उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. अखेर जखमींना खाजगी रुग्णालयात हलवावे लागले, तर काही रुग्णांवर स्थानिक नागरिकांनीच प्रथमोपचार केले. या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. केवळ सोशल मीडियावरील प्रसिद्धीसाठी प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या अशा बेजबाबदार चालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

# भारत-रशिया संरक्षण करार लागू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारत आणि रशिया यांच्यातील रेसिप्रोकल एक्सचेंज ऑफ लॉजिस्टिक सपोर्ट संरक्षण करार आता लागू झाला आहे. या अंतर्गत दोन्ही देश एकमेकांच्या भूमीवर ३००० सैनिक तैनात करू शकतील. यासोबतच ५ युद्धनौका आणि १० लष्करी विमानांच्या तैनातीलाही परवानगी देण्यात आली आहे.

दोन्ही देशांचे सैन्य एकमेकांच्या लष्करी तळ, हवाई तळ आणि बंदरांचा वापर करू शकतील, ज्यामुळे दीर्घकाळ चालणाऱ्या लष्करी तैनाती आणि ऑपरेशन्स सोपे होतील. या करारामध्ये लॉजिस्टिक सपोर्टचाही समावेश आहे. या अंतर्गत इंधन, पाणी, दुरुस्ती, तांत्रिक संसाधने आणि इतर आवश्यक पुरवठा उपलब्ध करून दिला जाईल. तसेच, विमानांसाठी एअर ट्रॅफिक कंट्रोल आणि उड्डाणांशी संबंधित सेवा देखील मिळतील. हा करार फेब्रुवारी २०२५ मध्ये स्वाक्षरित झाला होता आणि डिसेंबर २०२५ मध्ये रशियाने याला मंजुरी दिली.

# नाशिक टीसीएस प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून दखल

**नाशिक (प्रतिनिधी)** – देशातील आघाडीची आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) यांच्या नाशिक शाखेबाबत समोर आलेल्या धक्कादायक तक्रारीची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. दाखल एफआयआरमधील संशयितांची नावे स्पष्ट करण्यासह, त्यात टीसीएसच्या ऑपरेशन्स प्रमुखांचा समावेश आहे का, याबाबतही माहिती सादर करण्यास सांगितले आहे.

आयोगाने महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक, नाशिकचे पोलीस आयुक्त, कामगार आयुक्त तसेच टीसीएसच्या व्यवस्थापकीय संचालकांना नोटीस बजावली आहे. 'लीगल राइट्स ऑब्झर्व्हेटरी' या संस्थेने आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, टीसीएसच्या नाशिक शाखेत धर्मांतर आणि महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित गंभीर प्रकार घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तपासात हे एक मोठे रॅकेट असल्याचे संकेत मिळत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. याशिवाय, कंपनीतील वरिष्ठ मानव संसाधन अधिकाऱ्यांना या प्रकाराची माहिती असूनही ते गप्प बसून संशयितांना संरक्षण देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदाराने पुढे असेही म्हटले आहे की, नाशिक शाखेत 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वां'नुसार अंतर्गत तक्रार समिती (आय सी सी) स्थापन करण्यात आलेली नाही. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध नसल्याचे अधोरेखित करण्यात आले असून, ही बाब कॉर्पोरेट गव्हर्नन्समधील गंभीर त्रुटी असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

दरम्यान, आयोगाने या प्रकरणात कठोर भूमिका घेत महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांना निर्देश दिले आहेत. टीसीएसच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या अंतर्गत ' पॉश समितीची माहिती, मागील तीन वर्षांतील उपक्रम आणि प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीतून नेमकी काय तथ्ये समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आयोगाचे सहाय्यक निबंधक ब्रिजवीर सिंह यांनी हे पत्र जारी केले असून, पुढील सात दिवसांत 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाचे सदस्य प्रियंक कानूनगो यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम १२ अंतर्गत या प्रकरणाची सुनावणी घेतली आहे. आयोगाने महाराष्ट्र पोलीस महासंचालक आणि नाशिक पोलीस आयुक्तांना सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, कामगार आयुक्तांना टीसीएसच्या भारतातील सर्व शाखा, बीपीओ आणि उपकंपन्यांची माहिती तसेच त्यांच्या नोंदणी व परवान्यांचे तपशील सादर करण्यास सांगितले आहे.


# हदगाव नगर परिषद हदगाव

**ता. हदगाव जि. नांदेड ०२४६८-२२२४०८**

Email - cohadgaon@gmail.com स्थापना १९५४

ह.न.प. जा.क्र./बा.वी./२९२/२०२६ — दिनांक १७/०४/२०२६

**ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना**

**(वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी अनुदान योजना)**

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अर्हताप्राप्त तांत्रिक बी-१ द्वि लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाची कालावधी | ई निविदा भरणा फि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद हदगाव हद्दीत बगीचा विकसीत करणे. | ४००१११७/- | ४००११ | करार करतेवेळी १% बिलातून ८% | वर्ग ६ व त्यावरील | १८० दिवस | १००० |

अटी व शर्तीसह :

सविस्तर ई निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि. २०/०४/२०२६ ते २७/०४/२०२६ रोजी सायं. १७:०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. २७/०४/२०२६ रोजी सायं. १७:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद हदगाव**



## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की मी खाली सही करणाऱ्यांनी नांदेड येथील पुरुषोत्तम मुरलीधर डहाळे रा. वसंतनगर नांदेड ता. जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील मौजे धनेगाव हद्दीतील तिरुपती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित धनेगाव ता. जि. नांदेड सर्व नं. 112 जुना व नवीन 951 पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट न.305 ज्याची 30 x 40 साईज 1200 चौ. फुट येणे प्रमाणे चतुः सिमा-

पूर्वेस - प्लॉट नं. 284, पश्चिमेस - 20 फुट रोड, दक्षिणेस - प्लॉट नं 304, उत्तरेस - प्लॉट नं. 305 A आहे.

येणे प्रमाणे चतुःसीमेच्या आतील वर्णनाचा प्लॉट मी पुरुषोत्तम मुरलीधर डहाळे यांच्याकडून विकत घेण्याचा करार केला असून बयानापोटी काही रक्कमही दिली आहे तरी वरील प्लॉट बाबत कोणास काही आक्षेप उजर मालकी हक्क देवाण घेवाण कुळ कर्ज असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाच्या आत आमच्याकडे कागदपत्रासह आपला लेखी आक्षेप दाखल करावा मुदत संपल्यावर कोणाचाही आक्षेप नाही असे ग्राह्य धरून हा प्लॉट संबंधित सोसायटी मध्ये माझ्या नवे हस्तांतर व रजिस्ट्री करून घेण्यात येईल. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही म्हणून हे प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

जाहीर प्रगटन देणार ज्योती गंगाधर शिंदे रा. जिल्हा परिषदशाळेजवळ धनेगाव ता. जि.नांदेड

मोबाईल नं. 7588429547



## Change In Name

My Old Nane is **Sainath Shankarrao Malvatkar** Which now I am Changing as New Name: **Sainath Shankarrao Malwatkar** Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

:- Address :- Shankarrao Malwatkar
9-3-245 Near Ganpati Temple Vinkar Colony Chofala Itwara Nanded Maharashtra 431604



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# परशुरामांच्या व्यक्तिमत्त्वात पराक्रमाबरोबर ज्ञान, मातृभक्ती आणि धर्मरक्षणाची वृत्ती

## अतुलशास्त्री भगरे यांचे प्रतिपादन

**नांदेड (प्रतिनिधी)** –परशुरामांच्या व्यक्तिमत्त्वात पराक्रमाबरोबर ज्ञान, मातृभक्ती आणि धर्मरक्षणाची वृत्ती होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये शस्त्र आणि शास्त्र यांचा अनोखा मिलाफ होता, असे मत प्रख्यात प्रवचनकार अतुलशास्त्री भगरे यांनी नांदेड येथील श्री परशुराम तेजोत्सव कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात व्यक्त केले.



अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी प्रत्येक युगातील ब्राह्मण या विषयावर प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि चिंतनशील भाषण केले. चारही युगांतील ब्राह्मण समाजाची भूमिका, त्यांचे कर्तृत्व, त्याग आणि मूल्यव्यवस्था यांचा त्यांनी पौराणिक संदर्भासह वेध घेतला. या कार्यक्रमास महामंडलेश्वर महंत सुधीरदास, नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, संपादक शंतनू डोईफोडे तसेच नाशिक येथील भरतनाट्यमच्या गुरु सोनाली करंदीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी पत्रकार सुनील जोशी यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात आले, तर ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. दीपक कासराळीकर यांना 'अभिव्यक्ती धुरंदर' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच गुरु सोनाली करंदीकर यांचाही शहाजी उमाप यांच्या हस्ते सन्मान झाला. यानंतर 'संभवामी युगे युगे' हा प्रभावी नृत्याविष्कार नाशिक येथील नृत्याली भरतनाट्यम कला अकादमीच्या प्रमुख गुरु सोनाली करंदीकर व त्यांच्या शिष्यांकडून सादर करण्यात आला. संपूर्ण सभागृह हा नृत्याविष्कार पाहून मंत्रमुग्ध झाले. त्रेतायुगातील राजा जनक, सीता आणि रावण यांच्या कथांद्वारे त्यांनी अहंकाराचे दुष्परिणाम स्पष्ट केले. स्त्रीचा अवमान करणाऱ्या सामर्थ्यवान व्यक्तीलाही पतनाला सामोरे जावे लागते, असे सांगत नारीपूजा म्हणजे स्त्रीचा सन्मान हा संदेश त्यांनी दिला.

द्वापारयुगातील सुदामा आणि श्रीकृष्ण यांच्या मैत्रीचा दाखला देत त्यांनी स्वाभिमान, भक्ती आणि समाधानाचे महत्त्व पटवून दिले. संपत्तीपेक्षा मनःशांती मोठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कलियुगातील ब्राह्मणांची षट्कर्मे म्हणून अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह, यजन आणि याजन यांचा उल्लेख करून समाजप्रबोधनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले. कुटुंबसंस्कार, मातृ-पितृसेवा, संस्कृतीरक्षण आणि सद्वर्तन यांमधूनच समाज उन्नत होईल, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या भाषणास श्रोत्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक निखिल लातूरकर यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. गजानन पिंपरखेडे व अश्विनी चौधरी यांनी केले. प्रणोती बिलोलीकर यांनी सादर केलेल्या सुश्राव्य पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बसच्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू

**देगलूर (प्रतिनिधी)** –देगलूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान बस व स्कूटीचा अपघात झाला. या अपघातात बसच्या धडकेत महिला जागीच ठार झाली. मूळ लाळेगाव मंडळ जुक्कल तेलंगणातील रहिवासी तथा देगलूर राज्य परिवहन आगारातील सेवानिवृत्त वाहक मारोती कोळनुरे हे आपली पत्नी विजयाबाई यांच्यावर देगलूर शहरात वैद्यकीय उपचारानंतर व्यंकटेश्वरा पेट्रोलपंप येथे स्कुटीमध्ये पेट्रोल भरून मुख्य रस्त्यावर येत असताना हा अपघाता झाला.

यावेळी तेलंगणा राज्य परिवहन महामंडळाची बासवाड्याला जाणाऱ्या बसने (बस क्रमांक एपी २५ झेड ००८६) कोळनुरे यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली. त्यामध्ये कोळनुरे हे दूरवर फेकल्या गेले. त्यांची पत्नी बसच्या मागील टायरखाली येऊन डोक्यावरून चाक गेल्यामुळे महिलेचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती समजताच देगलूर पोलीस स्टेशनचे पो.नि. मारुती मुंडे हे घटनास्थळी येऊन त्यांनी बसचालक, बस व स्कुटी ताब्यात घेतली.

गुळगुळीत असे सिमेंट कॉंक्रीट तर कुठे डांबरी असे चकचकीत चार पदरी रस्त्यावर दुचाकी, चार चाकी व अवजड वाहने अतिसुसाट वेगाने रस्त्यावरून धावत आहेत. वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून वेगाचे उल्लंघन करीत बेजबाबदार वाहक आपली वाहने बेफाम चालवून निष्पापांचा जीव घेत आहेत. या प्रकारामुळे वाहनधारक आणि प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# तोतया पोलिसाकडून वृद्धाची ९२ हजारांची फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील जुना कौठा परिसरातील बियाणी पार्क भागात तोतया पोलिसाने खरा पोलीस असल्याचे भासवून एका वृद्धाची तब्बल ९२ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

गुरुवार, दि. १६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास बियाणी पार्क पाटीजवळ, कौठा, नांदेड येथे ही घटना घडली. अनोळखी आरोपीने फिर्यादीला आपण पोलीस असल्याचे सांगत परिसरात दंगल झाल्याचे खोटे कारण दिले. त्यानंतर सुरक्षिततेच्या कारणास्तव फिर्यादीकडील सोन्याचे दागिने कागदात गुंडाळून ठेवण्यास सांगितले. फिर्यादीने विश्वास ठेवून सोन्याच्या अंगठ्या व गळ्यातील लॉकेट (एकूण किंमत सुमारे ९२ हजार रुपये) काढून दिले. आरोपीने चलाखीने पुडी बदलून बनावट पुडी फिर्यादीच्या हातात दिली. काही वेळानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसात धाव घेतली.

याप्रकरणी श्यामसुंदर नथमलजी लड्डा (रा. घोडबंदर रोड वडवळी, ठाणे पश्चिम) यांच्या फिर्यादीवरून तोतया पोलिसाविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा' कार्यक्रमाच्या पूर्वतयारीची २६ रोजी बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** –'उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा' हा उपक्रम नांदेड येथे आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये कीर्तन महोत्सव, ११,००० ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संतचरित्र कथा या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी २६ एप्रिल रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

हा उत्सव ऐतिहासिक होण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात येणार असून, सर्वांना सेवा करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. सदरील बैठक ही श्री साई मंदिर, गोरक्षण कौठा वसरणी, नांदेड (गोदावरीच्या किनारी) सकाळी दहा वाजता होईल. या बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन नांदेड उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

'उत्सव संतांच्या कुंभमेळा वारकऱ्यांचा' हा कार्यक्रम मोदी ग्राउंड, नांदेड येथे होईल. यात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन महोत्सव, संत चरित्र कथा आरंभ, १ जानेवारी २०२७ सांगता, ९ जानेवारी २०२७ पवित्र औचित्य, संत ज्ञानेश्वर महाराज ७५० वे जन्म वर्ष, श्री संत गुरुगोविंद सिंघजी ३६१ वे जन्म वर्ष, संत नामदेव महाराज ६७५ वे समाधी वर्ष, संत जनाबाई ६७५ वे समाधी वर्ष, नारायण महाराज देहूकर ३७५ वे जन्म वर्ष, संत सावता महाराज ६७५ वे जन्म वर्ष, संत जनार्दन महाराज देशपांडे ४५० वे समाधी वर्ष, वेदांत केसरी रंगनाथ महाराज परभणीकर १३७ वे जन्म वर्ष, अखंड हरिनाम सप्ताह, अखंड नामस्मरण, कीर्तन महोत्सव, संत चरित्र कथा, ११,००० ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण १ जानेवारी रोजी पालखी सोहळा निघेल. पालखी मार्ग सांगवी ते राज कॉर्नर, वर्कशॉप, श्रीनगर, आयटीआय, शिवाजीनगर, वजीराबाद, कौठा ते मोदी मैदान विशेष आकर्षण ७५० पताका, ७५० तुळशी, ७५० कलश, ७५० विणेकरी, ७५० चोपदार, ७५० मृदंगाचार्य, ७५० फेटाधारी कीर्तनकार, ७५० टाळकरी, रथामागे लाखो भाविक चांदीच्या रथात ज्ञानेश्वरी ग्रंथ, तुकाराम गाथा व एकनाथ महाराजांचे ग्रंथ असतील, २ ते ८ जानेवारी २०२७ दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे ३ ते ६ काकड आरती, ६:३० ते १०:३० ज्ञानेश्वरी पारायण, ८:०० नाश्ता, १०:३० ते १२:३० सकाळचे कीर्तन, १२:३० ते २ महाप्रसाद, २ ते ३ हरिपाठ, ३ ते ५:३० संत चरित्र कथा, ६ ते ८ सायंकाळचे कीर्तन, ८ ते ९ महाप्रसाद, ९ जानेवारी (सांगता दिवस), ११ ते १ अमृतुल्य काल्याचे कीर्तन, त्यानंतर ५ लाख भाविकांसाठी पुरणपोळीचा महाप्रसाद, महाराष्ट्र व उत्तर प्रदेशातील नामवंत संत-महात्म्यांची उपस्थिती राहणार आहे. हा सोहळा नांदेडकरांसाठी एक चैतन्याची नांदी ठरणार आहे, अशी माहिती हभप ज्ञानेश भक्त महेश महाराज शेवाळकर यांनी दिली आहे.

# देगलुरात 'एटीएम'मध्ये ठणठणाट

**देगलूर (प्रतिनिधी)** शहरात गेल्या काही दिवसांपासून बहुतांश बँकेच्या एटीएममध्ये रोकड नसल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

भारतीय स्टेट बँकेच्या दोन्ही शाखेसह इतर बँकेच्या एटीएममध्ये अजिबात रोकड नसल्याने नागरिकांना मनःस्तापाला सामोरे जावे लागत आहे. भारतीय स्टेट बँकेचे कर्मचारी अपुऱ्या कॅशची कारणे सांगून ग्राहकास पुरेशी कॅश देत नाहीत. त्यात एटीएममध्ये खडखडाट असल्याने नागरिक दुहेरी संकटात सापडले आहेत. बँकेच्या व्यवस्थापकाकडे तक्रार करूनही व्यवस्थापक तक्रारीकडे अजिबात लक्ष देत नाहीत. बँकेच्या वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन एटीएममध्ये रोकड उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी बँकेच्या ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

# सौ. कमला संगेवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – जि. प. चे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी रामकृष्ण संगेवार यांच्या पत्नी सौ. कमला रामकृष्ण संगेवार यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी अल्पशा आजाराने शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १:३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# हजूर साहिब नांदेड-आसनसोल दरम्यान विशेष रेल्वेगाडी

**नांदेड (प्रतिनिधी)** –उन्हाळ्याच्या सुट्ट्यांदरम्यान प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त प्रवासी भार कमी करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागामार्फत हजूर साहिब नांदेड - आसनसोल दरम्यान उन्हाळी विशेष रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक ०७७०१ हजूर साहिब नांदेड-आसनसोल विशेष गाडी मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी हजूर साहिब नांदेड (२३:५० वा.) येथून सुटेल व आसनसोल (१२ वा.) येथे गुरुवारी पोहोचेल. पूर्णा (०२:२० वा.), हिंगोली (०३:५२ वा.), वाशिम (०४:५२ वा.), अकोला (०६:५० वा.), बडनेरा (०८:३२ वा.), नागपूर (१२:१० वा.), गोंदिया (१४:१५ वा.), दुर्ग (१६:३५ वा.), रायपूर (१७:३० वा.), बिलासपूर (१९:४५ वा.), झारसुगुडा (२३:३५ वा.), राऊरकेला (०१:५५ वा.), टाटानगर (०७:२० वा.), चांदिल (०८:३२ वा.) आणि पुरुलिया (०९:४२ वा.). परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक ०७७०२ आसनसोल-हजूर साहिब नांदेड विशेष ही गाडी दि. २३ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी आसनसोल (१४:०० वा.) येथून सुटेल व हजूर साहिब नांदेड (००:४५ वा.) येथे शनिवारी पोहोचेल.

परतीच्या प्रवासात गाडी आसनसोल (१४ वा.) येथून सुटून पुरुलिया (१६:०२ वा.), चांदिल (१७:०२ वा.), टाटानगर (१८:३० वा.), राऊरकेला (२२:३५ वा.), झारसुगुडा (००:३५ वा.), बिलासपूर (०४:१५ वा.), रायपूर (६:०२ वा.), दुर्ग (०६:५५ वा.), गोंदिया (०९:१५ वा.), नागपूर (११:३५ वा.), बडनेरा (१५:०५ वा.), अकोला (१८:३० वा.), वाशिम (१९:५२ वा.), हिंगोली (२०:५२ वा.) आणि पूर्णा (२२:५० वा.) येथे थांबून हजूर साहिब नांदेड (००:४५ वाजता) येथे पोहोचेल. रेल्वे प्रवाशांनी या विशेष रेल्वेगाडीचा लाभ घ्यावा व प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करून नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती विविध ठिकाणी हर्षोल्हासात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –मध्ययुगीत कालखंडात अनुभव मंडपाद्वारे समतेची शिकवण देणारे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### महापालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

जागतिक लोकशाहीचे जनक, थोर समाजसुधारक, क्रांतीयोगी महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या कौठा येथील अश्वारूढ पुतळ्यास दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी काळी १० वाजता महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर दीपकसिंह रावत आणि सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनीसुद्धा महात्मा बसवेश्वरांना अभिवादन केले.

महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकातील एक महान समाजसुधारक, तत्त्वज्ञ, कवी आणि लिंगायत संप्रदायाचे संस्थापक होते. त्यांनी कर्नाटकात सामाजिक समता आणि लोकशाही मूल्यांचा पाया रचला. महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील जातिव्यवस्था, विषमता दूर करून समानता, बंधुता आणि लोकशाही मूल्यांची रुजवण केली. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

याप्रसंगी खासदार डॉ. अजित गोपछडे, माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, सभागृह नेते महेश कनकदंडे, माजी सभापती किशोर स्वामी, माजी महापौर शैलजा स्वामी, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, नगरसेवक अभिषेक सौदे, राजू यन्नम, किशोर भवरे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार यांच्यासह पालिकेचे इतर विभाग प्रमुख आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जि.प.च्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्यातर्फे महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांनी केले. शिवा कर्मचारी महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष विठ्ठल ताकबीडे यांनी महात्मा बसवेश्वरांचा जीवनपट सादर केला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने लघुपटाचे सादरीकरण करण्यात आले. सूत्रसंचालन संजय कोठाळे यांनी केले तर ग्रामपंचायत अधिकारी शिवकुमार देशमुख यांच्या आभाराने कार्यक्रमाची



सांगता झाली.

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी जन्मोत्सव समितीच्या वतीने जिल्हा परिषद परिसरात अन्नदान वाटप केले. अनिल पाटील निमटेककर, शिवसांब चेड्डू, अशोक कासराळीकर, गजानन शिंदे, कमल दर्डा, अमृत शिंदे, ज्ञानेश्वर वानखेडे, आनंद खंदारे, बालाजी आवरदे, बालाजी घुम्मलवाड, रवींद्र पांडागळे, अलका मुगटकर, शंकर येवते, रमाकांत नावंदे, अशोक पाटील, गणेश देशमुख, परमेश्वर पांडागळे, संजय देशमुख, रुखमाजी मुदखेडे, मुक्तेश्वर चिवडे, सचिन सिध्देवाड, हरिहर विश्वासराव, प्रल्हाद थोरवटे, किशन बिडवे यांसह जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### 'स्वारातीम' विद्यापीठात बसवेश्वर जयंती साजरी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील



स्वागत कक्ष येथे रविवार, दि.१९ एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, गोविंद हंबर्डे, शिवाजी चांदणे, शिवाजी हुंडे, संभाजी धनमने, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### भोकरमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**भोकर** – बाराव्या शतकातील महान समाजसुधारक, समतानायक आणि वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८९५ वी जयंती भोकर शहरात अत्यंत उत्साहात साजरी करण्यात



आली. रविवार, १९ एप्रिल २०२६ रोजी शहरातील महात्मा बसवेश्वर यांच्या नियोजित पुतळा जागेच्या ठिकाणी हा मुख्य सोहळा पार पडला.

यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. काय कवे कैलास हा कर्माचा सिद्धांत मांडणाऱ्या बसवण्णांनी विधवा विवाहास प्रोत्साहन देऊन समाजात मोठी क्रांती घडवली, अशा शब्दांत यावेळी मान्यवरांनी त्यांना अभिवादन केले.

यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर हे केवळ एका समाजाचे नसून संपूर्ण मानवजातीचे दीपस्तंभ आहेत. त्यांनी ८०० वर्षांपूर्वी 'अनुभव मंटपा'च्या माध्यमातून लोकशाहीची मुळे रोवली आणि समतेचा विचार दिला. भोकर शहरात त्यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवर आज आम्ही त्यांच्या विचारांचे पूजन केले आहे. त्यांच्या विचारांवर चालणारा समाज घडवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. शहराच्या विकासात आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी महात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान आम्हा सर्वांना नेहमीच प्रेरणा देत राहील.

या जयंती सोहळ्यास उपनगराध्यक्ष दिलीप सोनवाडे, नगरसेविका प्रतिनिधी गणेश यशवंतकर, गौतम कसबे, डॉ. फेरोज इनामदार, सिद्धेश्वर पिटलेवाड, दिनेश लक्षटवार, विठ्ठल धोंडगे, नगरसेवक अविनाश वाघमारे, सतीश देशमुख, पत्रकार सिध्दार्थ जाधव, सोहम शेटे, मन्मथ शेटे, माधव श्रीखंडे, ॲड. विशाल दंडवे, संजय कोरटे, चंद्रकांत मुस्तापुरे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

### शिवमंदिर जुना लोहा येथे महात्मा बसेश्वर जयंती साजरी

**लोहा**– शहरातील शिवमंदिर लोहा येथे समतेचे पुरस्कर्ते जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची ८९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त शिव मंदिर जुना लोहा येथे भजन व महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या कीर्तीचा गजर करण्यात आला. यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते महात्मा बसेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी लोहा नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष दत्ता वाले, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, नगरसेवक कैलास कहाळेकर, बाळू गुरुजी शेटे, सचिन सावकार सूर्यवंशी, मिलिंद पवार, माजी नगरसेवक जीवन चव्हाण, वैभव हाके, लक्ष्मण कांजले, नंदकुमार कहाळेकर, विलास कहाळेकर, सुरेश कहाळेकर, गजानन शेटे व महिला भजनी मंडळ उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन चरित्रावर मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळू गुरुजी शेटे यांनी केले तर आभार सुरेश काकडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लक्ष्मण कांजले, सटवा शेटे, नगरसेवक कैलास कहाळेकर आदींनी परिश्रम घेतले.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com